

९८६३

म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. क्र. ९६३०

REFBK-0013492

REFBK-0013492



१३४९२
दा. क्र.

# प्रियंवदा

(कवितासंग्रह)

REFBK-0013492

REFBK-0013492

कवि

संजीव

किमत चार रुपये

प्रकाशक
पंडित अनंत कुलकर्णी
१८६ शनवार, पुणें २.

प्रथमावृत्ति १९६३

शिल्पकृती
कु. धनंजय कृ. दीक्षित

मुखपृष्ठ
कृ. गं. दीक्षित

मुद्रक
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

# हृद्गत

मी खूपच लिहिलं आणि खूपच प्रसिद्धहि झालं, म्हणून माझी मला त्रयस्थपणानं कवितांची निवड करतां येईना. माझे कवि मित्र डॉ. वि. म. कुलकर्णी, कविश्री मा. गो. काटकर B. A., B. T., पं. ना. कुलकर्णी B. A. B. T. वैराग, श्री. दिवाकर दुनाखे B. A., श्री. गु. सि. पत्तरगे (कवि–नीलाग्रज) M. Ed. यांनीं या कवितांची निवड केली. विशेपत: डॉ. वि. म. कुलकर्णी आणि पं. ना. कुलकर्णी यांनीं कांहीं सूचना व कांहीं फेरफार मला सुचविले. हें जिकीरीचें काम त्यांनीं फारच काळजीपूर्वक केलें आहे, त्या सर्वांचा मी ऋणी आहें.

किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, लोकसत्ता, सकाळ, तरुण–भारत, सुगंध, मराठवाडा, वाङ्मयशोभा, रोहिणी, दीप–लक्ष्मी; सुदर्शन, स्वराज्य, ललना, पैजण, शालापत्रक, आनंद, कुमार, चांदोबा, गंमत-जंमत, शिशुरंजन, मुलांचें मासिक, वसंत, अनुराधा, साहित्यलक्ष्मी, रहस्यरंजन, वीणा, हंस, प्रसाद, ज्ञानदूत, प्रतिष्ठान, पुढारी, शशी, साहित्य आशा, हेमंत, अभिव्यक्ति, कथासागर, सुषमा, रंभा, मेनका, विशाल सह्याद्री आदि सर्वच मासिकांनीं आणि मुखपत्रांनीं मला वेळोवेळीं प्रसिद्धि दिली त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या सहवासांत मला कांहीं नव्या प्रेरणा मिळाल्या. त्याचप्रमाणें पुस्तक प्रकाशनाबाबत नाटककार मो. स. साठे M.A. यांनींहि मला दिलासा दिला. या उभयतांचा मी आभारी आहें.

माझ्या कवितांचें संपादन–कार्य जवळ जवळ दीड वर्ष चाललें होतें. या अवधींत माझे कविमित्र दत्ता हलसगीकर, कविश्री रा. गो. मोरे, कविश्री मामा मुद्गल यांनीं मला जें सहकार्य केलें तें मी विसरूं शकत नाहीं.

चित्रकार दलाल आणि श्री. स. आ. जोगळेकर यांच्या पुस्तकावरून मी 'शृंगार नायिका' लिहिल्या आहेत. ही प्रुफें तपासल्याबद्दल आण्णा उर्फ सी. शं. साळुंके यांना धन्यवाद !

माझ्या काव्याच्या वेडाला मनमोकळेपणानें भरपूर रिकामपण देण्यासाठी माझी सहधर्मचारिणी सौ. विमल व माझे स्टुडीओ संचलन सहकारी श्री. राजाराम अ. यादव, श्री. गणपतराव गंधी, श्री. अंबादास यांनीं आजवर अपार कष्ट उचलले आहेत. हीं माझींच माणसें आहेत, तरी त्यांचाहि उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं.

हें प्रकाशन कार्य 'संजीव प्रकाशन समिती' नें हातीं घेतलें म्हणून त्यांचे आणि प्रकाशक श्री. पंडित अनंत कुलकर्णी यांनीं सर्वांगसुंदर स्वरूपांत ही 'प्रियंवदा' प्रकाशांत आणली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

जग फारच मोठें आहे त्याहून कविता मोठी आहे. त्या मानानें आम्हीं फारच छोटे आणि खोटे आहोंत; गडकऱ्यासारख्या प्रतिभावंत, समर्थ कवीनें म्हटलें आहे--

" कोठें आणि कधींतरी जगांत मी होवून गलों असे "
तिथें माझा काय पाड !

कृ. गं. दीक्षित
**(कवि संजीव)**
दीक्षित स्टुडिओ
नवीपेठ, सोलापूर

२६ एप्रिल १९६३
अक्षय्य तृतीया १८८५

## — संजीव प्रकाशन समितीचें निवेदन —

कवि संजीव यांच्या पन्नासाव्या वर्धापन दिनानिमित्त या कविता संग्रहाचें प्रकाशन व्हावयाचें होतें. समारंभाची धांवपळ आणि प्रकाशनाचें जिकीरीचें काम यांचा आम्हांला मेळ घालतां आला नाहीं; तरी परंतु हें प्रकाशन कार्य आम्हीं लांबणीवर न टाकतां तांतडीनें हातीं घेतलें.

मराठी कवितेच्या गेल्या दहा वर्षांच्या स्थित्यंतराचा विचार करतां त्यांच्या गेल्या पांच सहा वर्षांतीलच कविता यांत एकत्र केल्या आहेत. यांतील अनेक कविता लोकांनीं कंठगत केल्या आहेत. त्या जनमनांत रुजल्या आहेत; हें त्या काव्याचें सार्थकच होय. रेडीओ, रेकॉर्डस्, चित्रपट कथा, कविता भावगीतें, चित्रपटगीतें, लोकगीतें, लावण्या यांना मासिकें व मुखपत्रांनीं भरपूर प्रसिद्धि दिली आहे. कवि, लावणीकार, भागवीतकार म्हणून त्यांचें नांव घरोघर पोहोंचलें आहे. राहतां राहिलें तें पुस्तकच; म्हणून त्यासाठीं आम्हीं 'संजीव प्रकाशन समिती' ची स्थापना करून तिच्यामार्फत प्रकाशनें करावयाचें ठरवून त्यांतील पहिलें प्रकाशन 'प्रियंवदा' हें श्री. पंडित अनंतराव कुलकर्णी यांच्यामार्फत प्रसिद्ध होत आहे. याबद्दल प्रकाशन समिती त्यांची आभारी आहे. प्रियंवदेनंतर 'अत्तराचा फाया' (लावण्या आणि शृंगारिका–मराठी शेर) आणि त्यानंतर इतर प्रकाशनें लागोपाठ प्रकाशित करावयाची आहेत. ही प्रियंवदा रसिकांना प्रिय व्हावी ही सदिच्छा !

आपले

**दिवाकर डुनाखे B. A.; पं. ना. कुलकर्णी B. A., B. T., चंद्रकांत झुंजे, अण्णा जोशी, कल्लप्पा कानडे, विश्वास फाटे, सीताराम शंकरराव साळुंखे, प्रभाकर गणपुले, वसंत एकबोटे, शंकरराव कुलकर्णी**

# कवितानुक्रम


| | |
|---|---|
| महाराष्ट्र | ९ |
| अकरावा अवतार | १० |
| अर्घ्य | ११ |
| हिमालयाचा बर्फ तापला | १२ |
| जीवनकलह | १३ |
| " शिवशक्ती " | १४ |
| अर्थ आला जगण्याला | १५ |
| कांठ | १५ |
| चला उत्तरेकडे | १६ |
| ध्वज | १७ |
| जलतरंग | १७ |
| आपपर | १८ |
| जखम | १८ |
| चैत्रफळांचा नवा पवाडा | १९ |
| भस्मासूर | २० |
| तुझ्या संगतित | २१ |
| मैलाचा दगड | २२ |
| नैनं छिंदंति शस्त्राणि | २३ |
| गोरा मुखडा | २४ |
| जयजयकार | २५ |
| शेतकरी | २५ |
| कवठाचें झाड | २६ |
| अग्नि प्यावा | २७ |
| तूं तरणि माझि मैतरणी | २८ |
| मला अपेक्षित ज्योत हवी | २९ |
| षड्‌विकार मज हवेत सारे | ३० |
| नको पावसा रुसूं | ३१ |
| कधि होतो साक्षात्कार | ३१ |
| सेतू | ३२ |
| गुल्‌छडी | ३३ |
| मातीचे निरांजन | ३४ |
| सखि सूत्रधार | ३४ |
| आषाढ | ३५ |
| असेंच सुंदर दुःख असावे | ३६ |
| कसें ? | ३६ |
| शिक्षा | ३७ |
| कळत नाहीं वळत नाहीं | ३८ |
| मधमाशी | ३८ |
| अज्ञान | ३९ |
| विळखा | ३९ |
| भगवंत | ४० |
| नाजुक वांधा | ४१ |
| तुझे हात | ४२ |
| दंव | ४२ |
| माणूस | ४३ |
| बांसरी | ४४ |
| पाहूं या विठ्ठल | ४४ |
| पुरुषार्थ | ४५ |
| माझें मीच कवच फोडून– | ४५ |
| स्पर्श | ४६ |
| तुझीच सोबत हवी | ४७ |
| कार्तिकांतल्या प्रभात कालीं | ४७ |
| सपतात मृगजळें | ४८ |
| आज सकाळीं | ४९ |
| शेकोटीवर | ४९ |
| एक असें घर | ५० |
| कांटेरी चावा | ५१ |
| चरित्रनायक | ५१ |
| जयभारत | ५२ |
| हात | ५३ |
| सत्त्व | ५४ |
| स्थितप्रज्ञा | ५४ |
| आलीम उन्हांत | ५५ |
| पिंपळपक्षी | ५५ |
| आलाप | ५६ |
| अशीच तू येतेस अवेळीं | ५७ |
| वैशाखाच्या ऐन दुपारीं | ५८ |
| प्रीत तुझी माझी | ५९ |

| | |
|---|---|
| रंगखुणा | ६० |
| नवें पाणी | ६१ |
| अंगारा | ६२ |
| पिंपळ | ६२ |
| श्रावण | ६३ |
| तूं आलिस तेव्हां | ६३ |
| शिल्पकार | ६५ |
| वंशदिवा | ६५ |
| आकाश स्वतः मी व्हावें | ६६ |
| दाणापाणी | ६७ |
| प्राची | ६७ |
| अलका | ६८ |
| अेकच थेंब | ६९ |
| चिअुताई ! ! | ६९ |
| हुरुप ! | ७० |
| " थंडीच्या मनांत–" " गुलाबी गुपित " | ७१ |
| रसिकता | ७१ |
| मणिकांचन | ७२ |
| अस्फुटतेंतच अधिक रम्यता | ७३ |
| रस | ७४ |
| भीती जेव्हां दारीं येते | ७५ |
| ओली माती– | ७६ |
| अश्रूंचे यात्रिक | ७६ |
| दीपमाळ | ७७ |
| झोका | ७८ |
| कळि होता फुलराणी | ७९ |
| असत्य सत्य | ८० |
| वाटतें मला मी फसलो | ८१ |
| रुप्याच्या सुपांत | ८१ |
| अंतर | ८२ |
| उदयाचें फूल | ८३ |
| मी आणि तूं | ८४ |
| समर्पण | ८४ |
| ये अशी | ८५ |
| जिद्द | ८६ |
| छेद | ८६ |
| थंडी | ८७ |
| अशीच सुंदर रात्र असावी | ८७ |
| तीर्थ | ८८ |
| तळें | ८९ |
| रग | ८९ |
| घांस | ९० |
| व्यथा | ९१ |
| कळूनही तो कळत नाहिंसा | ९२ |
| आई | ९३ |
| चिरंजिवांस | ९४ |
| रुप तुझें समजुं दे विराट | ९५ |
| स्वप्न तटिनिच्या तटीं | ९६ |
| फणी आरसा | ९७ |
| शकुंतला | ९७ |
| तीलोत्तमा | ९८ |
| ईप्सित | ९९ |
| पूर्णविराम | १०० |
| चर | १०० |
| दुपार | १०१ |
| झाली पहांट पहांट | १०१ |
| आम्ही आहोंत बुद्धिवादी | १०२ |
| पहांट वारा | १०३ |
| अिंद्रचाप | १०३ |
| विष | १०४ |
| वसंत | १०५ |
| कांतिवर शांत तुळस मंजिरी | १०५ |
| सहज असावी अशीच कविता | १०६ |
| रंग बावरी रात्र | १०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| शेर | १०७ | पिसें | ११९ |
| कातर | १०८ | राष्ट्रध्वज | १२० |
| चंद्रावळ | १०९ | तंत कवीची नवी लावणी | १२१ |
| दृष्टि | ११० | चाललें तत्त्वाचें पूजन | १२२ |
| दंव पडलें | ११० | सुभगबंधुरा | १२३ |
| तीट | १११ | गुबुगुबु नंदीबैल | १२३ |
| वरदान | ११२ | ऋतु वासंतिक सम्राट | १२४ |
| मी दगडाचा नाहीं | ११२ | मज वदल हवा | १२५ |
| दिवा जळे कशासाठीं | ११३ | कधीं मज भेटशील सुंदरी | १२६ |
| खय्याम | ११३ | अहो, सारं नकली आहे | १२७ |
| मना | ११४ | काममूर्ति | १२८ |
| राजवर्खि जांभळा | ११४ | देव त्याला मुजरा करतात | १२९ |
| तीन तळाची माडी | ११५ | केसांचा किरिट शिरीं | १३० |
| करिल ती प्रतिभेचे काजवे | ११६ | ‘ स्त्री ’ | १३१ |
| माझा भारत देश | ११७ | ताजमहाल | १३२ |
| पडद्यामागें | ११८ | आठ शृंगार नायिका | १३२ |

९३४९२

# महाराष्ट्र

वज्राचें हें मनगट माझें, छाती पोलादाची
सह्यागिरीच्या सुळ्या सुळ्यांवर कीर्ती मर्दुमकीची
उशास धोंडा, खाया कोंडा, हृदयें सुम कमळाचीं
मेण मनांतुन कधीं भडकतें, ज्वाला ती अग्नीची
अभंगवाणी अमर तुक्याची, ओवी ज्ञानेशाची
अजुन डफावर रंगत आहे लज्जत शृंगाराची
जरि पटक्यासह भगवा झेंडा युती भोग त्यागाची
प्राण प्रतिष्ठा इथें पुरातन मानव धर्माची
देशाखातर तुरुंग फांशी लेणीं नवसाचीं
बाळपणांतच दिलीं आइनें आई शूरांची
रमणी इथल्या वाघ सिंहिणी जात मराठ्याची
रक्ताचा तो मळवट भाळीं, शोभा सौभाग्याची
छातीचा नवकोट उभारुन, राज्य आम्ही केलें
सम्राटाचें राज्यचिन्ह या मातित मळलेलें
राष्ट्रासाठीं इथें लाखदां, ईर्षा बलिदानाची
अजुन वाळली नाहित पानें ताज्या इतिहासाचीं
बोल मऱ्हाठी, भाव मऱ्हाठी, धार अमृताची
भारत गौरव माय मराठी, दुर्गा देशाची
नकाच डिवचूं कुणी अस्मिता मराठमोळ्याची
या भूमीवर परवड नाहीं स्फुटनिक गोळ्यांची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३६०५८ वि: काव्य
क्रमांक १६३० नों दि. १७/५/६७
२४-११-५९

★ ★ ★

# अकरावा अवतार

आदि अंत मी सर्व जगाचा
पृथ्विपुत्र मी पार्थिवतेचा
रंग रूप रस गंधांतुन या
घडला गाभा चैतन्याचा
तेजस्वीपण मज अग्नीचें
जीवन संजीवन उदकाचें
विशालतेनें झांकुन टाकिन
छत्र निळें त्या आकाशाचें
वाऱ्या सम मी अव्यक्ताच्या
घुमत राहतों वातावरणीं
अक्षरांत मी अक्षर झालों
वेदांतिल ओंकार होउनी
राजस तामस सत्व गुणांतुन
पापी अन् कधि पुण्यवान मी
पुरुषार्थांतिल पौरुष मी अन्
सहस्त्रकर मी सहस्त्राक्ष मी
हृदयाची मी आहे जाणिव
नेणिव मी अव्यक्त मनांतिल
ज्ञान बुद्धिच्या पलीकडे त्या
नेति नेति मी अज्ञातांतिल
अहंकार मी अस्तित्वाचा
निराकार मी कधि अविकार
माणुस माझें नांव चिरंतन
अकरावा मी जगि अवतार

२४-८-६२

*     *     *

# अर्घ्य

लाल भडक त्या बुरुजांमागुन हळूच डोकावतो
कुणाचा दिव्य स्वर्ण भाव तो
त्या सोन्याची होइल चांदी तोंवर फांदीवर
नांदि कुणि गाती खग सुस्वर
हिंदोळे पाळणे फुलांचे वेलीवर टांगले
आत्मसुख आत्मरंगिं रंगलें
नव्या दंवाचे ठिपके ठिपके झुपक्या झुडुपांवर
अभ्रकी अक्षर क्षणभंगुर
बांधिली वायुनें मोट पहा आपुली
ती गंध भेट परि त्यांत न सामावली
कुणि पराग कणिका मातीवर उधळिली
पाणथळांतिल रस कांचेचा किरणकरें चुंबिला
त्यामध्यें हेतू प्रतिबिंबिला
तृणांकुरांचे वासुदेव हे भूमींतुन उगवती
पिसारे तुरे शिरीं शोभती
हिरवे हिरवे हात केळिचे अलगद वर झेलिले
कुणा हे नमस्कार चालले ?
जांब, सिताफळ, चिंचा, अवळे, कार्तिकांतले धन
कुणा हें नजराणें उधळुन ?
ये नभांत आतां अनादि नारायणा
तूं पहिला वहिला प्रभातिचा पाहुणा
विसरलों मीहि रे ! माझ्यांतिल मीपणा
चैतन्याच्या संजीवनिची ‘ संथा ’ तूं मज दिली
सोडितों ‘ अर्घ्य ’ तुझ्यास्तव जलीं

२०-१०-५७

* * *

# हिमालयाचा बर्फ तापला !

हिमालयाचा बर्फ तापला ओकितसे जाळ
सत्य अहिंसा शांति नीतिची जळली जपमाळ
पंचशील संपले भारता होइ युद्धखोर
घरांत अपुल्या घुसून आला लाल चिनी चोर
याद राख पण चिन्या ! नाहि हा प्रदेश झुरळांचा
इंचा इंचासाठि इथें खच पडेल सिंहांचा
वासुदेव बळवंत, राजगुरु, भगतसिंहवीर
सत्तावनची सशस्त्र क्रांती देइ नवा धीर
सोलापुरचे चार हुतात्मे धनशेट्टी–कुरबान
शिंदे अन् सारडा फांशिवर करिति प्राण कुरबान !
देशाखातर बलिदानाच्या वेदीवर मरणें
हेंच आमुचें ब्रीद घडविलें आमुच्या आईनें
रायगडाच्या समशेरीचें शासन प्यालेला
दख्खनचा यशवंत मराठा तिथें आघाडीला
सह्यगिरीची झेलिल छाती तोफांचे गोळे
कोट उभारुन करिति पहारा नऊ कोट डोळे
महाराष्ट्राच्या रक्त क्रांतिचा ज्वलंत इतिहास
लेखणि अन् तल्वार तराजू वाहूं देशास
स्वातंत्र्याचें सिंहासन अन् राजदंड अमुचा
खंडित होतां मांडु लढाई पिंडधर्म अमुचा
उठलें जग तरि, लढूं जगाशीं तुझी चिन्या मग काय कथा!
जिथें ठेवशिल पाय तेथली माती होइल शस्त्र स्वतां
अभिमन्यूसम लढतिल बाळें युद्ध जयांच्या जन्मखुणा
मालुसऱ्याचे मामा होउन वृद्ध तरुण होतील पुन्हा
पद्मिणिचा जोहार झांशिच्या राणीचीही याद असे
सौभाग्याचें कुंकू आतां युद्धाचें तापते ठसे
सोनें नाणें स्थावर जंगम भूमाते ! घे तुझे तुला

तूंच पाजिलें दूध म्हणुन घे रक्ताचा नैवेद्य तुला
मारूं अथवा मरूं जिद्द ही सरहद्दीसाठीं
प्रकांड हत्याकांड व्हायचें होवो त्यासाठीं
मरणाचें भय कुणास कुसवा धन्य तुझा आई
तुझ्याचपायीं मरूं लाखदां पुन्हा जन्म देई
आई पुन्हां जन्म देई

२-१२-६२

* * *

## जीवनकलह

हृदयाला दाह हवा
तें जिवंत समजावें
तेच खरे डोळे जे
ठिणग्यांनीं उमलावें

हात हवा, शौर्याची
भिरभिरते ज्यांत हवा
मेरुपरीं भूकंपीं
पाय तसा स्थिर व्हावा

क्षण संकटिं कंटकमय
शरिरीं रोमांच हवे
या जीवन–कलहाला
कलहाचें वेड हवें

२०–८–५८

* * *

# " शिवशक्ती "

तूं शिवशक्ती ।।
आदिमाय तूं सिद्ध अनादी
तूंच आमुची ऋद्धीसिद्धी
तुझ्याचपासुन जगदुत्पत्ती ! तूं शिवशक्ती !
ओंकाराच्या हुंकारांतुन
तूंच प्रकटलिस मुळाक्षरांतुन
सर्व रसांची तूं रसवंती ! तूं शिवशक्ती !
स्वतां जळालिस दक्षाच्या घरीं
वीरभद्र शांतविला स्वकरीं
यज्ञांतिल तूं सती पार्वती ! तूं शिवशक्ती !
महिषासुर कांपवी धरित्री
केल्या प्रलयंकर नवरात्रीं
रुद्र भयानक तेजोमूर्ती ! तूं शिवशक्ती !
तुझ्याचसाठीं वधिला रावण
भिजलें रामाचें रामायण
अग्निदिव्य तूं जानकी सती ! तूं शिवशक्ती
तूंच जिजाई, लक्ष्मीबाई
तूंच फुल्यांची रखमाबाई
रमा पंडिता सेवामूर्ती ! तूं शिवशक्ती !
भगिनि, कुमारी ! कांते माते !
मानवता तव अंकि वाढते
तुझींच स्तोत्रें जिव्हेवरती ! तूं शिवशक्ती !
तूं प्रीती तूं स्फूर्ति चिरं-जय
केला तूं संसार सारमय
जीवन दीक्षा तुझीच जगती ! तूं शिवशक्ती !

१९-९-५७

* * *

## अर्थ आला जगण्याला

अंधाराची काळी छत्री–तेजःपुंज तारकांची
उघड्या या जगावर–उघडीच असायची
तुझा आशिर्वाद कृपा–सनातन असायची
आदि अंत यांची स्थिती–कुणाला न कळायची
नकळत गर्जवितो–तुझा टाळ वीणा तरी
तुझ्या अभंगाचा भाव–माझें समाधान करी
त्यांत कांहीं सांपडती–तुझ्या अनामिक खुणा
अरे एवढ्यानें होतो–उणा जीव माझा दुणा
पुन्हां उद्यां जगायचें–जगण्याला नाहीं अर्थ
परमार्थ तो न कळे–आहे सारें व्यर्थ व्यर्थ
तेव्हां मला धीर देई–माझ्यासारखाच कुणी
हात पाय नाक डोळे–माझा मी पुरतेपणीं
नाहीं देवपण मला–देवा माझें रूप तुला
स्वल्प अशा साम्यानेंही–अर्थ आला जगण्याला

५–१२–५८

* * *

## कांठ

कांठ होऊन कांठी बसलों
माझी तहान सुटत नाहीं
रोज पीतों त्या पाण्याची
मला ओळख पटत नाहीं
प्रवाह नुसता वहात आहे
मी नुसता पहात आहे
माझ्या मनाचा सारा चिखल
उपहासानें हसत आहे

१३–८–५९

* * *

# चला उत्तरेकडे

चला उत्तरेकडे गर्जती तोफांचे चौघडे
दक्षिणेंतले तुफान वारे शिरले चोहींकडे
पुरुषार्थाला हें आव्हान
त्यासाठी करुं रणिं बलिदान
हिमालयाच्या पायावरती घालूं आपुले सडे ।। धृ० ।।

माती इथली शौर्य पिकवितें
तलवारीचें पाणी पीतें
सावरकर श्री टिळक फुल्यांचे हातीं वज्रचुडे
उदंड माझ्या भारत खंडीं
रणकुंडीं या मारुं मुसंडी
आग भडकल्या सह्याद्रीचे तुटतिल आता कडे ।। धृ० ।।

वारस आम्ही शिवरायाचे
शासक आम्ही राज्यशाहीचे
राजदंड समशेर सलामत संरक्षण बापुडे ।। धृ० ।।

आमुच्या कांता आमुच्या माता
आदि शक्तिचा तेजस गाथा
कुंकू त्यांचें रक्त आमुचें म्हणून असे तांबडें ।। धृ० ।।

घरभेद्यांनीं राष्ट्र बुडविलें
म्हणुन चिन्यांना आज फावले
राष्ट्रद्रोहि हें वेचुन काढा अन्नामधले खडे ।। धृ० ।।

लाल चीनची करूंच रक्षा
अन्यायाला हवीच शिक्षा
दीक्षा आम्ही अशी घेतली भारतमातेपुढें ।। धृ० ।।

५-१२-६२

* * *

## ध्वज

जगण्याला जिद्द हवी, जगण्याची लढण्याची
फुलणाऱ्या पुष्पा कां खंत तुला गळण्याची ?
भर तुफान शीड तुझें, पर्वा कां दरियाची ?
तांडेला साथ हवी साहसास धैर्याची
क्षण येइल मोहाचा रंभेचें रूप धरुन
माणुस तूं पोहत ये मोहाच्या डोहांतुन
पाप कधीं, पुण्य कधीं, अघटित कधि जगिं घडतें
उःशापासाठि पुन्हां शापित मन तडफडतें
भाव सघन जीव तुझा, कधि रडेल कधि हंसेल
गूढगर्भ रात्रींतच, तत्त्वांचा रवि असेल
शिंप कधीं मोत्याची, माती कधि करि येते
करुं नको हिशेब वजा बाकी ही अशि असते
यात्रा ही अशि अखंड महिमा हा काळाचा
जातांना रोवुन जा ध्वज महान कीर्तीचा

२१-८-६१

* * *

## जलतरंग

डोळ्याचा जलतरंग
पापणि ही वाजविते
त्या लयींत तालावर
-- आणि मला नाचविते
नाद तुझा मम नर्तन
एकरूप होऊं दे दोघांचें आवर्तन

१३-८-५९

* * *

## – आपपर –

हिरव्या चुडयाला – फूल कुंकवाचें
अभाग्याचें घर, – झालें सौभाग्याचें
करंटया करांनीं – बांधिलेले मणी
आज कसे झाले – सखे चिंतामणी
बळि गेला खालीं – तीन पावलांनीं
लक्ष्मी वर आली – सात पावलांनीं
साक्ष तांदळाची – अक्षय मनांत
त्याच तांदळाचा – केशराचा भात
कुणाची साखर – कुणाचें केशर
प्रीतीमधें नाहीं – आतां आपपर

९-११-६०

* * *

## जखम

रसरसल्या दोन कळया
आसुसल्या किति बाई !
ओठांच्या कांठावर
पापणिच्या पंखांना
पिजतसे फुलपक्षी
दृष्टीच्या देंठावर !
आवर्तन चक्रगती
लज्जेच्या तालावर
गुल्मोहर गालांवर
शब्दांना वाव नसे
भावनेस बंध नसे
वेड तुझें वेडावित
— फिरतें या जखमांवर

४-३-५८

* * *

# चैत्रफळांचा नवा पवाडा

चैत्रफळांचा नवा पवाडा
माळी दादा करा निवाडा !
आहे माझें नांव कलींगड
फूटबॉल परि तो अवजड
वरती हिरवे आंतुन लाल
जसा कांहीं गोड गुलाल
माळी दादा करा निवाडा
चैत्रफळांचा नवा पवाडा !
माझें नांव अहो टरबूज
राखा आधीं माझिच बूज
अक्षांशाच्या रेघा रेघा
टरफलावरी भेगा भेगा
पहांटेचा सूर्य जसा
रंग शेंदरी छान तसा
चव तर माझी अंबुसगोड
चाखा माझी फोड नि फोड
माळी दादा करा निवाडा
चैत्रफळांचा नवा पवाडा !
साखरकाकडी माझें नांव
हातभर आहे माझे गांव
अंगावरती शिरा शिरा
बाळपणाची नवी तऱ्हा
शुभ्र पोपटी रंग कसा
पाचण्याचा मी डोह तसा
माळी दादा करा निवाडा
चैत्रफळांचा नवा पवाडा !
सर्व फळांची मी राणी

सुटेल जिभलीला पाणी
माझें नांव अंबट कैरी
माझ्यासाठीं चोराचोरी
माळी दादा करा निवाडा
चैत्रफळांचा नवा पवाडा !
खस् खस् खस् लांब सुरी
माळी त्याना चिरी चिरी
माळी खातो फोड फोड
म्हणतो तुम्ही सर्वच गोड
माळ्याचा हा असा निवाडा
चैत्रफळांचा असा पवाडा !

१२-४-५९

* * *

## " भस्मासुर "

मातीला वरदान मिळालें,
सजीव झाला माणुस त्यांतुन ।
अतर्क्य कांहीं करावयाचें,
बसला आहे कयास बांधुन ॥ १ ॥

नव्या जगाची नवी निर्मिती,
रोज सारखी चालू आहे ।
लोखंडाची पोलादाची,
माया नगरी होते आहे ॥ २ ॥

विज्ञानांतुन मंतरेला,
भस्मासुर अवतरे अणूंतुन ।
—— आज जगाच्या संहाराला,
माणुस उठला माणुसकींतुन ॥ ३ ॥

* * *

# तुझ्या संगतित

तुझ्या संगतित
उदासवाण्या जिवास फुटतो
नवा पिसारा मनोज्ञ सुंदर
तुझ्या संगतित
मेघांवरची विचित्र सुंदर
चित्रलिपी पाहून मनाचा
मोर नाचतो पदन्यास टाकित **कलामय**
तुझ्या संगतित
चंद्राची खंजिरी वाजवित
नाचवितों मी तारांगण तें
स्वर्गंगेला मधेच रोधुन
तुझ्या संगतित
प्राचि पश्चिमा
घरास माझ्या रंग लाविती
लाल मुलायम सांजसकाळीं
तुझ्या संगतित
रसरूपाचा अर्थ कळाला
सुगंधांतलें गुपित उमगलें
मृण्मय कणकण
बोलुं लागले जिवंत होउन
तुझ्या संगतित !!
तुझ्या संगतित
वायु जयाला स्पर्श करीना
अंबर ज्याला झाकुं शकेना
पृथ्वीवर जें स्थिर राहीना
वन्हि जयाला जाळुं शकेना

त्या सर्वांना आरपार मी
स्पर्शुनि जातो तुझ्या संगीतत
तुझ्या संगीतत
ओंकारांतुन वेदऋचा संहिता बोललों
जीव स्पर्शी साहित्याला
शब्द ब्रम्हांतून सारखा
कल्पलतेला बहर आणुनी
नव्या युगाला
वाचा फोडिन तुझ्या संगीतया

२१-६-५६

* * *

## मैलाचा दगड

चालतां पायाला
लागतसे ठेंच
मागचा शहाणा
त्याला पडे पेंच
किति ठेंचाळली
किती रक्ताळली
दुष्ट तहानली
वाट ही अशीच
कुणी न थांबला
जरी तो आंबला
मैलाचे दगड
मोजित चालला
खुणेचा दगड
स्वतःच होउन
एके दिनीं मीही
बसेन रुतून

५-४-६१

* * *

# नैनं छिंदंति शस्त्राणि !

मज जाळुं शकेना
वीज वन्हि वा अन्य
जळते ती जडता
अमर मीच चैतन्य
अणु हैड्रोजन वा
विध्वंसक अस्त्रांनो !
या पोलादाच्या
सर्व यंत्र शस्त्रांनो
तोडाल किती तुम्हि
रक्त मांस मातीचे
मी उठविन माती
दान मला मंत्राचें
किति योद्धे झाले
युद्धें आलीं गेलीं
मी झालों नाहीं
कोणाच्याहि हवाली
ॐ सत्य सनातन
मीं तर शांतिः शांती
शांतींत क्रांति अन्
क्रांति हीच विश्रांती
चालूं द्या तुमचे प्रयोग
तुमचा भोग
भोगाला गेला भागुन
माझा योग
मी अमर म्हणुन तर
जगली ही मानवता

मज जीर्ण शीर्णता
अथवा नाहीं नवता

२१–८–६२

* * *

## गोरा मुखडा !

गोरा मुखडा, भांग वाकडा, अंबाडा फाकडा
केवडा घालुनी बसला तिडा ।।
अबोल गहिरा, भगवा गजरा, जसा सुवासिक झरा
विजेची झीग त्यामधें जरा
पान कण्हेरी धारदार तशि शीर कोरिली शिरीं
रूपाचें भाकित सांगे चिरी
करवंदाचे काळे डोळे भिवई काजळमुळी
पापणिस सुरम्याची सांखळी
लोण्यांत कुणी कां कालविलें केशर
त्या मार्दवांतही मराठिचा मोहर
ते बुरुज छातीचे ढासळते अस्थिर
जुडी करून ठेविल्या जोडिनें लाल रेशमी लडी
दुमडली अधरांबुज-दल–घडी
केंस कातळी कर्ण मासळी बुगडि बाळि नेसली
कपोलीं सदाफुली माखली
चिंचपेटिचे दांत हिऱ्याचे हिरडीच्या कोंदणीं
कुंकवा खालिं हिरवि गोंदणी
तो तडफदार किति कासोटा दक्षिणीं
इरकली लाल पदराची ही पक्षिणी
पोटिमा चोळितुन गोल वलय चंदनी
बघतां बघतां घालि चारुता  रतिरंगाचा सडा
केवडा घालुन बसला तिडा –

२०–१०–५७

* * *

## जयजयकार

भारत निर्मू नवा तयाचा करीत जयजयकार !!
जित्या जागत्या लोकशाहिचे आम्ही वारसदार ।। ध्रु ० ।।
नाहित तोफा, नाहित किल्ले, नाहित घोडेस्वार
तिरकमठा पट्टाही नाहीं, गर्नाळ्यांचा बार
नव्या ले णिस परंतु आहे तलवारीची धार ।। १ ।।
भगीरथाचे प्रयत्न होतिल भगिरथ अपरंपार
कोंड्याचा तो करून मांडा ध्येय करूं साकार
यत्नवेदिवर कष्ट कोटिंचा करूंया स्वाहाकार ।। २ ।।
चंद्रमौळितिल शंभू आम्ही वृत्ति नाहि लाचार
ज्वलंत ही अस्मिता आमुची दुसरा खदिरांगार
कर्मयोग भोगांतहि आहे अध्यात्माचें सार ।। ३ ।।
परस्परांतहि बंधुभावना इथें प्रीतिसहकार
केला आम्ही माणुसकीचा त्रिवार जयजयकार
बुद्ध, कृष्ण, झरतुष्ट्र, महंमद, ख्रिस्त आम्हांला प्यार ।। ४ ।।
ज्ञान आणखी विज्ञानांतुन यंत्रांचा अवतार
स्पुटनिक उडेल उद्यास अमुचें अपार गगनविहार
उद्योगाच्या या पर्वातून सर्वांगिण उद्धार ।। ५ ।।
सस्यशामला सुजला सुफला हा अमुचा बडिवार
स्वर्णभूमिचा झाला आहे पुनश्च साक्षात्कार
स्वर्णयुगाची नांदी गाऊं त्याची ही ललकार ।। ६ ।।

२४-११-५८

* * *

## शेतकरी

काळ्या मातित, हिरव्या वाती, प्रकाशल्या ज्योती
रविकिरणांच्या ओंजळींत किति झगमगती मोतीं
आज वाहतें नद्यांत केशर, सुगंध मातीला
रंग बावन्या आभाळाच्या भिडला छातीला

कार्तिकांतलें ऊन दुजें कीं कोजागिरि दूध
शांत सांवल्यामधे सांडला धूसरला ऊद
प्राजक्ताची स्फटिक पोवळीं सुवर्ण शेवंती
इंद्रधनूचे रंग उधळिती फुलल्या फुलवंती
फळाफळांवर जीवकळा ये मळा मोसमांत
डरकाळचा फोडीत उभा हा नंदी पांदींत
दिवस सुगीचे 'बांग' कोंबडा देइ पहांटेला
झोपडींत त्या शेतकऱ्याचा 'अभंग' गहिंवरला
घरधनीण घरिं राम पहांटे त्यास ओवि गाते
प्रीतीचा तो खर्ज लागतां घरघरतें जाते
देव दिवाळित होइ पाहुणा घरोघरीं येतो
वसुंधरेचा पांग फेडुनी शेतकरी हसतो
—कोठारांतुन धान्य भरावे तयें रित्या पोटीं
'चोरा मलिदा' अशी आमुची रीतच उफराटी

२६–८–५८

* * *

## कवठाचें झाड

हिंदकळे नयनतळें, वरकाळें शेवाळें
पापणिच्या केसांची, हिरवळ त्या वरति रुळे
ओठांच्या काठांवर, शरबती शराब मिळे
मदनवदन चंद्राचे, उजळतात चंद्रनळे
न्हालिस तूं मानेवर, केसांचे गंधमळे
दरवळत्या देहावर, चंदनि थरकांप चळे
सौधावर वाळविसी ओले नवलाख पिळे
पायतळीं डगमगतें, कवठाचें झाड खुळें

५–११–६०

* * *

# अग्नि घ्यावा !

इथल्या मातीत बलिदानाचें ब्रीद अमर पिकतें
युगायुगांच्या युग पुरुषांची मान इथें झुकते
सह्यगिरीच्या दरीं गिरींतिल पुण्यशील या शिळा
पोलादाच्या सामर्थ्याची ज्वलंत जीवकळा
फडकवितो रे इथला वारा झेंडा बंडाचा
स्फूर्तीचाही उगम हाच या भारत खंडाचा
फुलांस इथल्या वास सदोदित सद्‌गुण गंधाचा
भीमथडीवर मृदंग घुमतो ऋणानुबंधाचा
नद्या वाहती सहिष्णुतेनें जित्या जिव्हाळ्यानें
तरून जाती महापुरांतही लव्हा लव्हाळ्यानें
सागर इथला खारट पण तें इमान देशाचें
तिखटपणाच्या तल्वारीचें शिवार दःखनचें
इथली ज्वारी इथला हुर्डा खुराक मर्दांचा
बारा मावळ जगला त्यावर पाइक देशाचा
सद्धर्माचें सिंहासन अन् छत्र राजदंड
लंगोटी लावून घडविती इथें असा पिंड
कोटि सूर्यही दिपून जातिल बघुन अस्मितेला
गीता ज्ञानेश्वरी नमविते प्रज्ञावंताला
एका हातीं कुबडी झोळी समर्थ जगिं ठरले
कंगालाचे अभंग ते तर पाण्यावर तरले
त्याग आणि वितराग व्रतानें व्रतस्थ ही भूमी
भोगलालसा नसे कुणाला कर्मयोगि आम्ही
" शहा " न झाला कुणी रंगिला विलास नच ठावा
इथें घ्यायचा जन्म तयानें फक्त अग्नि घ्यावा

१५-८-६१

* * *

# तूं तरणि माझि मैतरणी

तूं तरणि माझि मैतरणि स्वरूप वैतरणि भरणि नक्षत्रा
सखि सुरेख चित्रापरि ती राजसपुत्रा ॥ धृ० ॥
केशांत, ततुकोशांत, सुभगवेशांत घमघमे मरवा ॥
अंगांत भर्‌जरी शालु अश्विनी हिरवा ॥
तो उभार बांधा, भार ज्वानिचा वार करी तरि गरती ॥
भृकुटिच्या कट्यारी इष्कि इषारे करितीं ॥
गोंडाळ दंडि दाटली, चोळि आंतली सुरंग कुसुंबी ॥
करि झोंवाझोंबी अंचळ पीन नितंबी ॥
किति नरम कोंवळी सोनसांवळी काया ॥
मन्मथें मोहमय मंतरली मद–माया ॥
वेडावुन धरणी तिची जाहली छाया ॥
ती चाल, तिची नखरेल केरवा ताल खुलवि सर्वत्र ॥
सखि सुरेख चित्रापरि ती राजसपुत्रा ॥
वेणिच्या दोन संगिनी, दुज्या नागिणी पन्हाळी पाठीं ॥
तिजसाठीं झाली दाटादाटी हाटीं ॥
बिलवरी आयने दोन तिचे ते नयन चपल हरिणीचे ॥
लवथवतें यौवन आषाढीं चपलेचें ॥
हुरमुंज, कपोली गुंज, उगवती सांज, अधरदल बुंद
लाघवी चतुरभाषणीं गोड गुलकंद ॥
ओवली माळ प्राजक्ती पोंवळ ओठीं ॥
तन्मणी दुल्लडी रुळती वर्तुळ कंठीं ॥
हनुवटी जशी कीं अंब्यामधली बाठीं
गुलनार सखी दिलदार मदन दलभार वयानें सत्रा ॥
सखि सुरेख चित्रापरि ती राजसपुत्रा ॥

१०–९–५७

* * *

# मला अपेक्षित ज्योत हवी

तेलवात पणतींत तिष्ठते
मला अपेक्षित ज्योत हवी ॥ धृ० ॥

विचार ज्यांचें अमृतमंथन
शरीर ज्यांचें चंदन इंधन
ज्वलंत त्यांच्या त्यागामधली
एकच ज्वाला मला हवी ॥ १ ॥

मानवतेचे मानदंड जे
धैर्याचे पोलादखंड जे
घाव घणांच्या ठिणग्यामधली
एकच ठिणगी मला हवी ॥ २ ॥

देशास्तव फांसावर चढले
मरणहि ज्यांच्यासाठीं रडलें
पावन त्यांच्या वेदीवरची
जळती समिधा मला हवी ॥ ३ ॥

कर्मयोग सेवारत अविरत
संत दयार्णव निरिच्छ संतत
विश्वाचें कल्याण–निरंजन
त्यांतिल कणिका मला हवी ॥ ४ ॥

सारस्वत जें जना जगवितें
आईसम जें मला भरवितें
आत्मोद्धारक त्या प्रतिभेंतिल
स्फूर्तिशलाका मला हवी
मला अपेक्षित ज्योत हवी ॥ ५ ॥

१५-६-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. पुस्तकपत.
अनुक्रम ३६०५९ दिः ०।=
९६३०

# षड्विकार मज हवेत सारे

रसमय जीवन करायचें तर, षड्विकार मज हवेत सारे
पुरुषार्थांतिल पहिला काम
रतिरंगांतिल रंग विराम
अभिरामेचा मी अभिराम
शृंगारांतुन प्रीति अवतरे ॥ धृ० ॥ १ ॥
अतिक्रमण अन्याय गांजणुक
इथें चालली सदा पिळवणुक
क्रोध हवा प्रतिकारक तारक
जमदग्नीचे भरते वारे ॥ धृ० २ ॥
लोभानें तर लोभस जीवन
लोभ नसे तर कसलें जीवन
प्रवृत्तिला हें जणुं आवाहन
कर्तृत्वाचे उठवुं मिनारे ॥ धृ० ॥ ३ ॥
स्पर्श, रूप, रस, गंधाची या
मनांत माझ्या अमाप माया
सर्व जगावर त्याची किमया
मोहाविण जगिं शून्य पसारे
मदमस्तीचा होऊं द्या वग
तारुण्यांतिल शिगोशीग रग
धगधग, तगमग आणिक झगमग
एकदांच हें घडतें सारें ॥ धृ० ॥ ४ ॥
असुं द्या तात्त्विक सात्त्विक मत्सर
मत्सर वाढवि ईर्षा दृढतर
यांतच उत्कर्षाला अवसर
ज्वलंत जीवन फुलवि निखारे ॥ धृ० ॥ ५ ॥

२३–९–५९

* * *

## नको पावसा, रुसूं

नको पावसा, रुसूं
नको रे आभाळांतुन असूं
जलधारांचा नको मारखा
ताशा बडवित बसूं
हिरवीं हिरवीं कवळीं पानें
नको सारखीं फिसूं
वेली म्हणती काळी मेंदी
लावित आपण बसूं
गढूळलेल्या ओघळांत या
टपटपणारे हसूं
धार विजेची तलवारीनें
पाडित जाते कुसूं
पाण्याचा हा सेतू–सांधुन
तुला भेटली–वसूं
चिमण्यांच्या या कागदि नावा
जळीं लागल्या दिसूं
भाग्य उद्यांचें नवांकुराला
नकोच वेड्या पुसूं

१४–८–५८

* * *

## कधिं कधिं होतो साक्षात्कार

कधिं कधिं होतो साक्षात्कार
भक्तिज्ञान वैराग्यावाचुन
होई प्रभू साकार ।। धृ० ।।
देवाच्याही देवपणाहुन ।।
मानवांतलें श्रेष्ठ देवपण ।।

जागृत अनुभूतीचा येतो
प्रत्यय वारंवार ॥ १ ॥
मानव नाहीं मुळांत दानव ॥
आम्हीच कौरव आम्हीच पांडव ॥
जागा होतो आमुच्यांतला
कृष्ण कधीं दिल्दार ॥ २ ॥
जे कोणी रंजले गांजले
त्यांना जो म्हणतसे आपुले
मानव्यावर देवमाणसे
करिती किति उपकार ॥ ३ ॥
स्वार्थपरायण अम्हि प्रापंचिक
राजस तामसतेंतुन सात्त्विक
मंथनांत त्या हलाहलासह
येते अमृतधार ॥ ४ ॥
उत्पत्ति स्थिति अन् प्रलयांत ॥
जगवुन जगते मानवजात ॥
तुमच्या आमच्या पुण्याईचा
इथे सदा सहकार ॥ ५ ॥

* * *

## सेतू

ग्रीष्म ऋतूनें तापविलेल्या
मुशी ढगांच्या फुटल्या तुटल्या
शीत रसाच्या तिरप्या रेषा
वातावरणा कांपित सुटल्या
स्वर्ग धरेला सांधायाचा
कैक दिसांचा मनांत हेतू
उभा कसा राहील परंतू
कोसळत्या पाण्याचा सेतू

२४-५-५७

* * *

# गुलछडी !

गुलछडी, परिस मी खडी, नजर वाकडी करुन तोऱ्यांत
किति बघतां बघतां अडखळले भवऱ्यांत
साडीस जरीची घडी, वरति त्या खडी पुनव चंद्राची
ती चंद्रमुखीं झालि दैना त्या चंद्राची
रेशमी दुपेडी, लडी वेणि माझि सडी म्हणुन कां हलते
ओझ्यानं छातिच्या कमर माझि कशि कलते
दुल्लडी माळ वरचढी, बुगडि कानांत चमक मोत्यांची
तांबूस खुलावट मेंदि पाय जोत्याची
कापल्या पपइचा रंग माझ्या अंगाचा
धरि ऋजुता भाळीं रजतरंग भांगाचा
नजरेंत शराबी रंग इष्कि ढंगाचा
घातली अंब्याची अढी पदराची घडी सावरिति हात
किति बघतां बघतां अडखळले भवऱ्यांत
लुसलुशित बर्फिची वडी, केशराचि काडि वरति टोंचावी
त्या बुबळांवरती पापणि तशि शोभावी
नागीण काढिते फडी बघुन सौंगडी जादु पुंगीची
सजणाची सय कशि यावि मस्त गुंगीची
त्याचि तऱ्हा धीट रांगडी, माझि बांगडी पिचुनिया जाते
बिजलीच्या झोतानं मीहि मेघ अडवीते
नदिकांठि दुपारीं धुणं धुवाया जातें
शीळ येतां त्याची रानभरी मी होतें
मी विसरुन जातें बाई होतें नव्हतें
तापल्या सूर्याची साक्ष ठेवुन हृदयांत दिला हाति हात
मी बघतां बघतां रमलें मनरमणांत

५-११-५९

* * *

...३

## मातीचें निरांजन

ओठांच्या ओंजळींत
जाई कळिदार दिसे
गजऱ्याचा फूलपक्षि
पाकळिची फुलवि पिसे
पापणिचा देव्हारा
सिंहासन पाऱ्याचें
नीळवंत नयन तुझे
लुकलुकत्या ताऱ्याचे
कचपाशीं भांगाचें
सोनसळ आलेखन
रूप नदीचाच काय
सुगम असा उगम इथुन
कर्दळि तूं नेसलीस
केळीची काचोळी
पदर उडे पाठीचा
जरतारी पाकोळी
सांजवेळ होउन, अशि—
आलिस तव पदरंजन
पेटवून गेलिस पण
" मातीचें नीरांजन "

२०-८-३१

* * *

## सखि सूत्रधार

तुझ्या शेंदुरानें आलें देवपण
परंतु मी आहे मुळांत पाषाण
तुझा धूपदीप उजळे गाभारा
तुझा आत्मत्याग प्रकाश हा सारा

झिजविले तुवा कष्टांचें चंदन
तुझ्यामुळें झालें गंधीत जीवन
तुझी पाणपोयी माझ्या वाळवंटीं
सुदाम्यास भेटे जसा जगजेठी
तुझें पांघरूण माझें संरक्षण
ना तरि एकटें उघडें जीवन
तुझा मिळे हात तुझि मिळे साथ
म्हणून मी आलों असा माणसांत
दुःख माणसाचें सुख माणसाचें
समजाया हवें मन माणसाचें
तेंहि तुवा दिलें मन सुकुमार
तुवा फुलविलें मन कणखर
तुझा सेवाधर्म आणि शुश्रूषा
वाढविते नवी जगण्याची आशा
कुरुक्षेत्र आहे संसार संसार
जय अर्जुनाचा सखी सूत्रधार

३-११-५६

* * *

## आषाढ

विजेच्या पक्ष्याची होइ फडफड
काळ्या पहाडांची काजळली कड
मृगानें मांडिला—आभाळांत फड
कडें ढोलक्याची साथ कडाकड
पर्जन्य लावणी सूर वरचढ
तुटति थेंबांचे घुंगरु तडातड
नव्या अत्तराचीं पानीं पडझड
मातीच्या मनांत, मुरतो आषाढ

१५-६-५८

* * *

# असेंच सुंदर दुःख असावें

ज्या दुःखानें जळतां जळतां
नवतेजानें गगन उजळतां
ढळतांनाही स्वर्ण समर्पित
झुबर ताऱ्यांचें वितरावें
असेंच सुंदर दुःख असावें

विद्ध शरानें व्हावें आंतुन
फडफडणाऱ्या त्या पंखांतुन
क्रौंचवधांतुन रामाचें तें
रामायण जगतास मिळावें
असेंच सुंदर दुःख असावें

क्रूसावरती फांसावरती
अमर जयांची लिहिली कीर्ती
मानवांतल्या त्या देवांना
देवेंद्रानें आसन द्यावें
असेंच सुंदर दुःख असावें

दुःख असावें असेंच सुंदर
रडला ज्यास्तव बुद्ध शिकंदर
अपार करुणेंतुन अशा या
उत्थापन दुःखास मिळावें
असेंच सुंदर दुःख असावें

१२–३–५८
तुळजापूर

* * *

# कसें ?

इंद्रधनूला माहित नाहीं
सप्तरंग खुलतात कसे ?

फळां फुलांना माहित नाहीं
कळे कळे फुलतात कसे ?
पार्थिवतेला माहित नाहीं
मुळे मुळे उलतात कसे ?
पक्ष्यांनाही माहित नाहीं
दोन पंख हलतात कसे ?
जगणाऱ्यांना नाहीं माहित
जगतों आपण रोज कसें
सुख दुःखाची भरति ओहटी
होतो दर्यापार कसे ?

७–६–५६

* * *

## शिक्षा

काल रात्रिची मदालसा तूं
दिवसा दिवशीं अलख निरंजन
तमी पेटसी शृंगारें उरि
तरी प्रभातीं करि  ीरांजन
रक्त तापतां मूर्तिमंत तें
करितो स्वकरें मूर्तीभंजन
त्याच करानें परी घालिसी
या डोळ्यांना सखोल अंजन
भोगाची तूं भाग्यवती पण
त्यागाची तूं तशीच दीक्षा
लोलुप माझा मीच लाजतों
मलाच होते माझी शिक्षा

२४–१०–६०

* * *

# कळत नाहीं वळत नाहीं

माझं एक गाणं आहे
त्याला ताल नाहीं सूर नाहीं
माझं एक नाण आहे
त्याला तोल नाहीं मोल नाहीं
माझं एक खाणं आहे
तें पुरतही नाहीं उरतही नाहीं
माझं एक जीणं आहे
तें कळतही नाहीं नी वळतही नाहीं

२३-१०-६०

* * *

# मधमाशी

दिवसरात्रिचे पंख लावुनी
स्थूलांतुन सूक्ष्मांत कधींही
व्यक्त कधीं अव्यक्त कधींही
अलकापुरिच्या उद्यानांतिल
पराग कणकण वेंच वेंचुनी
शब्दांच्या पोळ्यांत सारखा
मध सांठविते
त्याच मधाच्या कैफावरती
जगणारी ही बघ मधमाशी
अशी अचानक
कधीं जिवाला डसते डसते

२-८-५७

* * *

## अज्ञान

ताल नाहीं सूर नाहीं
परी इथं भाव आहे
भित नाहीं छत नाहीं
परी इथं ठाव आहे
बळ नाहीं कळ नाहीं
परी इथं घाव आहे
बुद्धी नाहीं चातुर्य नाहीं
भोळा माझा सद्भाव आहे

२४–१०–६०

* * *

## विळखा

दिल दर्या झाकुं नको
पदराच्या अभ्रकांत
केसांच्या लाटेवर
गंध येइ गीत गात
ओठांच्या कांठावर
मार्दवांत भिजलेला
मुष्कहिना कांचेच्या
बंद शिशित थिजलेला
कांटेरी पापणि ही
करवती कमानदार
सहज मला कापित जा
यांत खरा दिल्बहार
उजळतें विराट विश्व
लोभस तव स्पर्श किती

रोमांचित कायेवर
कोटि कळ्या थरथरती
या कळ्यांत या मळ्यांत
फक्त एक फूल फुलें
देहांच्या कुंपणास
विळख्यांची तार जुळ

१२-५-६३

* * *

## भगवंत

कर कटावरि
ठेवुनिया ईशा
जगाचा तमाशा, पाहतोस
विटेवर असा
कसा खिळलास
आतां दगडास, पान फुटे
अणु युगांत या
युगें अठ्ठावीस
जाहली खलास, यंत्रामुळें
यंत्र लोखंडाचें
मंत्र विज्ञानाचे
तंत्र जगण्याचें, आगळेंच
पराधीन जीणें
एवढीच खंत
नर भगवंत, असतां झाला

४-४-६१

* * *

# नाजुक बांधा

नाजुक बांधा असा असावा
जशी गुलछडी हलती फुलती
गोल असावा तसाच खांदा
जशी पालखी हलती झुलती
असा असावा डोळा सुंदर
चंचळ आणि असावा निर्मळ
शीतळ ज्यांतुन चंद्र दिसावा
आणि असावा सूर्यहि सोज्वळ
ओठ असावा असाच गहिरा
वाग्वीणेचा कोमल पडदा
सहज बोलतां उठेल ज्यांतुन
बोल तराणा दिडदा दिडदा
आणि असा कचपाश असावा
ज्या पाशानें पाश सुटावा
कलासक्त सौंदर्य समाधित
मोहाचा ही मोह तुटावा
हात असावा असा यशस्वी
कल्पलतेची नाजुक फांदी
कुबेर आपल्या भांडाराची
ज्या हातानें लिहील यादी
पाय लाडके असा असावा
ज्यांतुन सुंदर कमळ उठतिल
कमळांतुन कमळजा पाहुनी
आणि कुणाचे कर ही जुळतिल

१३-८-५९

* * *

## तुझे हात

अंगुलिच्या अग्रांना
गुल्मोहर डौलदार
तळव्यांना मेंदीचें
अस्तर किति रंगदार

ओंजळिचा पळसपक्षि
उघडझांप करीत असे
स्पर्शास्तव हळुच कधीं
स्कंधावर फुलत बसे

हात तुझे भाग्याचे
म्हणुन मीहि भाग्यवंत
सिद्ध हस्त संसारा
करिति सदा औक्षवंत !

४-७-५८

*   *   *

## दंव

केशरी दूध तापविलें
पहांटेच्या कोमट कांठी
चांदीची दुधाची वाटी

लाविली नभानें ओठीं
त्यांतून थेंब ओघळले
पानांच्या पृष्ठीं देठीं

२३-११-५७

*   *   *

# माणूस !

मरणाला मारून आजवर
जगला आहे जगांत माणुस
गति पृथ्वीची स्थितीस आणी
अणु शक्तीनें अणु परिमाणुस
जगला आहे जगण्यासाठीं
डोंगर ओझें घेऊन पाठीं
सुख दु:खाची पराजयाची
वाटेवर या दाटादाटी
तुमचा आमुचा विरोध त्याला
विरोध रोधुन उभा राहिला
पोलादाच्या पराक्रमानें
समाज त्यानें सर्व नमविला
काळाशी झुंजून सदोदित
युगायुगांवर केली मात
चिरंजीव संपदा तयाची
अक्षर वाङमय कला नितांत
ब्रह्म सत्य अन् जग मिथ्या तर
त्रिकाल जग हें आहे चालू
तयें पाडिलें सत्य शिवाला
सौंदर्याला अनेक पैलू
मरणाला मारून आजवर
जगला आहे जगांत माणुस
उद्यां देवही येतिल दारीं
स्वर्गाचा द्यावयास वारस

२२।८।६२

* * *

## बांसरी !

या कळकांवर
छिद्रें सुंदर दहा कोरिलीं
ज्ञानाची कर्माची अक्षय
संजीवक प्रेरणा भारुनी
प्राणवायु फुंकून स्वयंभू
कळकाची केलीस बांसरी
वाजविणारा तूं गिरिधारी
अमृतमय स्वर्गीय अंगुली
फिरतां त्यांवर तुझी अनंता
हृदयंगम स्वरसंगम जुळला
जीवन संगित लहर लहरलें
जीवनांतल्या विसंगतींतुन विरूपतेंतुन
क्षणभर आली मला सफलता
त्याच क्षणाला जपतां जपतां
पिचेल पावा मला न कळतां
परंतु त्यांचे सूर कुठेंतरि
विलीन होतिल, विराट तुझिया, विश्व संगिती

२०-१०-५७

* * *

## पाहूं या विठ्ठल

चांदण्याचे टाळ बुक्का आभाळाचा
निळ्या वाळवंटीं मेळावा संतांचा
पांढऱ्या ढगांचीं मंदिरें शिखरें
आकाश गंगची चंद्रभागा झरे
काळोखाची दिंडी चालली अथांग
उडवित लाह्या अनाम अभंग
प्रभात पताका नभाचें राउळ
लाल पगडीचा पाहूं या विठ्ठल

२०-११-५७

* * *

## पुरुषार्थ

सूर्याला त्या ग्रहण लागतां
तो न म्हणे मज मुक्त करा
मरणोन्मुख तो भीष्म म्हणाला
मजसाठीं शरमंच करा
भूतदयेस्तव शिबि राजानें
रक्ताचा फोडिला झरा
क्रूसावरचा येशु म्हणाला
शत्रूंवर उपकार करा
अपुल्या पुरत्या संसारांतुन
विश्वाचा संसार करा
हीन दीन हा भेद कशाला,
एकच माती विविध तऱ्हा
सर्वाठायीं एकच आत्मा
चराचरावर प्रेम करा
दिव्या दिव्यानें दिवे पेटवुन
तेजोमय हें जगत् करा
हाच असे पुरुषार्थ खरा.

१३-६-५८

* * *

## माझें मीच कवच फोडून –

माझें मीच कवच फोडून
छिन्नभिन्न झालों आतां
विराट विश्वरूप तुझें
दिसतें आहे विश्वनाथा
जगण्यामधली ईर्षा गळली
माझा मीच झालों जागा

खरोखर जगण्याचाही
	हातीं आला थोडा धागा
परिघ व्यास कळत नाहीं
	वर्तुळ मोठें होत आहे
बिंदुइतुकी ठिणगी पण
	पेट जगाचा घेत आहे
कांहीं तरी पेटत आहे
	खोल माझ्या आंत उरांत
अपार करुणा कविता गाते
	घेउन माझा साज साथ.

१२-८-५८

* * *

## स्पर्श

नकळत येतो असा अभावित
	स्पर्श तुझा तो राजस लोभस
काजळलेल्या कडा मनाच्या
	होति उषेसम अस्फुट तांबुस
पांची बोटें पांच मुखांनीं
	करिती पंचप्राण प्रवाहित
कायेवरच्या संगमस्थानीं
	स्पर्शाचें सर्गीय मनोरथ
धमन्यांतिल स्वरतंतु अनामिक
	स्पर्शानें छेडिसी अचानक
रोमांच्याच्या रागदारिचें
	फुलारतें अनुकंपन मोहक
स्पर्शाची स्पर्शाला कळते
	अबोध भाषा अबोध हेतू
हरवुन जातों पार्थिवतेंतिल
	परस्परांतिल सखये ! मी तूं !

३-७-५८

* * *

## तुझीच सोबत हवी--

तुझीच सोबत हवी—सख्या मज तुझीच सोबत हवी
सावित्रीची पुन्हां एकदां कथा होउं दे नवी ॥ धृ ॥
जीर्ण शीर्ण जीवनास देसी पुनश्च दृष्टी नवी ॥
स्पर्श तुझा आणितो नव्यानें निर्माल्या टवटवी ॥
लघुत्तमा मी लाडिक परि तूं दृढभाजक लाघवी ॥
वसंत माधव तुझ्या मधूची झालें मी माधवी
कविता माझी केलिस राया स्वतः होउनी कवी ॥
अभिरामा मी लोभस परि तूं वैश्वदेव वैभवी ॥
भावछटांनीं आणिलीस किति सुख दुःखांना चवी
मूर्तिमंत अज्ञानी मी तूं साक्षात तेजोरवी ॥
जळींजळीचा संगम परि तो अद्वैता वाहवी
तुला आळवित संपवीन मी शेवटची भैरवी
तुझीच सोबत हवी, सख्या मज तुझीच सोबत हवी ॥

११–६–५८

* * *

## कार्तिकांतल्या प्रभात कालीं

कार्तिकांतल्या प्रभात कालीं
आहे मी पण आंबट ओली
दंवादंवानें थबथबलेली
फुललेली जणु मी फुलवेली
शामसांवळी राजसबाळी
ल्याली शालू चिंब हिर्वळी
तिचे कुरळ कच पाश ओलसर
कार्तिकांतलीं उन्हें कोंवळीं
मयुर पिसांसह कमल दलांसह
चिमणी झाली स्नात नवेली
एकच पाना वरी बांधिली

पानाची कुणी नवी हवेली
गर्भ रेशमी घन–जलदांची
अंत:करणें थबथबलेलीं
गाभाऱ्यांतील देवावरची
भूपाळी भक्तीनें भिजली
घरच्या देव्हाऱ्यांत निरांजन
स्नेहल वात तुपानें थिजली
सहाण दगडी संसारांतिल
झाली आहे चंदन ओली
कार्तिकांतल्या प्रभात कालीं
आहे मी पण अंबट ओली
तुझ्या प्रीतिची ऊब गुलाबी
मउ मखमाली मउमखमाली

५–७–५८

* * *

## संपतात मृगजळें

तुझें हास्य मोकळें
उमलत्या जाईजुईचे कळे
दो नयनांच्या चंद्र नळ्यांतुन
फुलबाजा ओघळे ॥
तुझी नि माझी ओळख पुरती
पुरतेपणि मज कळे
सहवासांतुन एकत्वाचें
क्षितिज उजळलें निळें
एकच फांदीवर डौलानें
बसलें आपुलें जुळें
अमृतांत जणुं दोन मनांचे
मुरले बघ आंवळे
अभेदांत या सुखदु:खाची
संपताल मृगजळें

* * *

## आज सकाळीं

आज सकाळीं—
तन्वंगाची, रंगपंचमी
रंग बदामी, त्यांत नाहलों पुरा पुरा मी
आज सकाळीं !!
तव रूपाची, शरद् पौणिमा
अथांग सुषमा, त्यांत डुंबलों पुरा पुरा मी
आज सकाळीं !
सौंदर्याच्या, सारंगीच्या
जुळवित होतिस तारा तारा गंधसंगमीं
आज सकाळीं !
दर्पणांत त्या
गडद मेघमल्हार स्वरांनीं—
बांधित होतिस राग अनावट
घाटदार तें केशकलामय
आज सकाळीं !
तुला आळवित नयनीं माझ्या
जगे जोगिया तुझ्या संभ्रमीं
आज सकाळीं !

३–३–५८

* * *

## शेकोटीवर

रविकिरणांनो ! कशास येतां
घेउन आतां ऊन मल्मली ?
सरत्या माघांतिल ही थंडी
मला वाटतें अधिक मखमली
नाहिं तल्खली परंतु आहे
हिमांगना मी आज हिंवाळी

...४

आणि कुठेंतरि अशाचवेळीं
उधाण येतें आंत उसाळी
उधाण येतां चळतें पाऊल
वळणावरची वाटहि मळते
मळलेले ते पाय पुसाया—
वाटेवरि त्या कुणितरि येते
कलत्या ढळत्या सूर्याखालीं
अशी आमुची भेटहि जुळते
शेकोटीवर बसण्या आधिच
कधिंच लाजरी थंडी जळते

२-११-६०

* * *

## एक असें घर

एक असे घर बांधू ये चल
भिंत न ज्याला दार न ज्याला
दगड विटांचें बंधन कां हें
प्रत्येकाच्या संसाराला ?
हें जमवावें तें जमवावें
यांतुन सारा स्वार्थ वाढला
आणि हवित मग कड्या नि कुलप
हें सारें मग जपावयाला
कृत्रिम बंधन कृत्रिम जीवन
अमुचा आम्ही तुरुंग केला
काळ सारखा हंसतो आहे
अमुच्या असल्या मूर्खपणाला
संत महात्मे ! युगपुरुषांनीं
कधीं कशाचा संचय केला
एक असें घर बांधू य चल
भिंत न ज्याला दार न ज्याला

१-९-५९

* * *

## कांटेरी चावा

त्या कलत्या सूर्याखालीं
त्या ढळत्या संध्याकाळीं
कुजबूज मनाची सरतां
उलगडल्या मिटल्या ओळी
शब्दांतुन निशब्दांचें
वाढलें अनामिक गूढ
परि दोघांनाही होती
आंतून सारखी ओढ
मुखचंद्र उभा शेजारीं
चांदणें मला प्रक्षाळी
रेखिली आमुच्यासाठीं
तान्यांनीं वर रांगोळी
स्पर्शानें बावरलें मी
सावरतां त्यांचा हात
कांटेरी चावा होता
थरथरत्या रोमांचांत

२-११-६०

* * *

## "चारित्रनायक"

तेज विजचें लखलखलें पण
प्यालों आगहि तिची भयानक
प्राजक्तानें दरवळलों पण
पायदळीं चिरडलोंहि नाहक
भव्य दिव्य त्या शिल्पायतनीं
केली मी मम मूर्ती मोहक

संग्रहालय ठाणे

टवके मी काढिले स्वतःचे
सोशित छिनिचे घाव विदारक
सुर्यचुंबि त्या सूर्यफुलांसम
जगांत आतां माझें कौतुक
मुळामुळांतिल माती खाउन
विकसन मी वधिलें अनामिक
यज्ञाच्या या सांगतेस मी
स्वतः होमिलें कायिक वाचिक
मरणाच्या दारांत शेवटीं
जग म्हणतें मज "चरित्रनायक"

८-३-५८

* * *

## जयभारत

तरुणा ! तव रक्ताला, नित्य नवा ताप हवा
तव लहरी तापाला, थोडा अनुताप हवा
रंग तुला आवडती, रंगिव तूं चित्र नवें
समजो तुज एवढेंच, चित्र हें विचित्र नव्हें !
कवळावें व्योमाला, ढवळावा तूं सिंधू !
तूं सहस्त्र अश्वशक्ति, तूं समर्थ मानबिंदु
तरुणा ! तुज प्रीत हवी, विपरित परि रीत नको
रति सतिची युति व्हावी, थिल्लर तें सोंग नको
ज्ञानदेव तात तुझा, ज्ञानदीप उजळ करी
ज्ञानांतुन विज्ञाना, अणुयुगांत संस्कारी
मानवता धर्म तुझा, कर्मयोगि तूं अविरत
सोन्याची द्वारकाच, करि भारत जय भारत

२१-८-६२

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ३६०५८ वि: काव्य ५३
क्रमांक ९६३० नों दि: १०/८८

# हात

कशासाठीं मला
दोन हात दिले ?
हातुन या व्हावें
तृप्त भुकेलेले ॥ १ ॥

ज्यांना कुणी नाहीं
त्यांचा कळो हेत
दोन्ही हातांनीं या
डोळे पुसावेत ॥ २ ॥

कशासाठीं मला
दिले दोन हात
अन्याया साठींच
करीन प्रपात ॥ ३ ॥

एक आहे डावा
एक तो उजवा
हातीं समतोल
पुण्याचा ताजवा ॥ ४ ॥

हात तसे दंड
आणि तें उदंड
पराक्रम करूं
पाहती उदंड ॥ ५ ॥

हात जोडूनी ते
लववितों माथा
दिव्य साक्षात्कारीं
जीवन समर्था ॥ ६ ॥

* * *

## सत्व

गंगा–भागीरथी परी–माझी आई माझी आई !
तीर्थे सारीं सामावलीं–माझ्या तीर्थरुपा ठायीं
मनोमंदिरांत माझ्या–आहे सद्‌भावांची ठेव
राउळांत राहणारा–माझ्या घरिं आहे देव
आहे शिव शक्ति परि–आम्हां दोघांचि ही जोडी
अमृताच्या गोडीनेंच–किती सुटतात कोडीं !
संसाराचा गोवर्धन–आम्हीं उचलावा किती ?
माझ्या चिमण्या बाळांचे–हात इवले लागती
केलें दान यथाशक्ति–माझि अल्पशी दानत
धर्म माणुसकीचाच–जागविला अखंडित
व्यवहारी हारजीत–जग आणखी कठोर
परि " सत्व " अंतरीचें–सर्व जगाहून थोर

२६।७।५८

* * *

## स्थितप्रज्ञा

आपत्ती येतात
त्या पोलादाचें धैर्य देउन जातात
दुःखें येतात
तीं सुखाचा दिलासा देऊन जातात
सुखें येतात
तीं मात्र नुसतेंच तोंड दाखवून जातात
तीं जातात
तेव्हां मला सर्वस्वी रिता करून जातात
आतां तूंही
माझ्या मस्तकावर येशूप्रमाणें काटेरी मुकुट चढविलास
आतां त्या काट्यावर
फुलें फुलविण्याचें अपार सामर्थ्यही मला तूंच दे
नी तीं फुललेलीं फुलें
पाहाण्याची अगाध स्थितप्रज्ञाही मला तूंच दे

१६–८–५८

* * *

# आलीस उन्हांत

शुभ्र कमळाच्या आलीस उन्हांत
शीतळ चांदण्या फुलल्या मनांत
अश्विनी सौभाग्य पाचूंच्या बनांत
रत्नांचे ताटवे भूमि कोंदणांत
स्फटिकाच्या जळीं वाढतें रिंगण
कांठची लव्हाळी करि शिलंगण
संगमरवरि गज ते पेंगले
गोकर्णी फुलांनीं आभाळ रंगलें
आरपार पाणी भरलें अथांग
छायेच्या सायीचे गोठले तवंग
त्यांत बुडविला माठ तूं मातीचा
पाण्यानें चुंबिला रंग तो मेंदिचा
भरली घागर मातीचें वशिंड
पाझरून झरे अंबाडचाची पिंड
वाहुन ती गंगा—गौरीनें आणिली
माझी पापणी त्या—उन्हांत नाहली

७–११–५७

* * *

# पिंपळपक्षी

हिरवा पिवळा
पिंपळपक्षी
उभा......
एका पायावर
नजर लावीत
आकाशावर

शिशिर ऋतूंत
गळलीं पिसें
नवें पंख
फुटलें कसें ?
याचाहि नाहीं
खेद नि खंत
पुन्हां फुलणें
एकच पंथ.

१-४-६१

* * *

## आलाप

थेंबांचें शिंपित गाणें
रिमझिमतां पाउस आला
मृद्‌गंधित निश्वासांना
थंडावा थोडा आला
बर्फाचा घेऊन पंखा
हळु वारा पाऊल टाकी
त्या हिरव्या आनंदाला
लाखेची रंग लकाकी
मातीच्या छातीवरती
ही पाणकळा भिजतांना
चिखलांत पाहिली तेव्हां
कस्तुरी अशी फुलतांना
त्या कस्तुरिच्या रंगाचा
कचपाश तुझा ग ओला
बरसाती धुंदपणानें
तूं स्वकरें विमुक्त केला

त्या पावसांत मी भिजतां
रक्ताला आला ताप
कायेवर अनुरागानें
घेतले किती आलाप

२३-५-६१

* * *

## अशीच तूं येतेस अवेळीं

अशीच तूं येतेस अवेळीं
मन माझें पडलेलें असतें
अडचणींत अडगळीं गबाळीं
अशीच तूं येतेस अवेळीं
पर्यंकावर देहाच्या
सुस्तल्या जिवाला
चाटून जाते
तुझी जरीची लालट चोळी
अशीच तूं येतेस अवेळीं
कळ्या आंतल्या
विसकटलेल्या असतांना तूं
जुळवून जाशी पुष्प ओंजळीं
अशीच तूं येतेस अवेळीं
गजबजलेल्या, गर्दीमधल्या
धकाधकींतून जातां जातां
लावून तूं जातेस जिव्हाळी
अशीच तूं येतेस अवेळीं
कलहानें मी क्लांत होउनी
निपचित पडतां
हलत डुलत येतेस लावुनी

बिंदि बिजवरा चंद्र कपाळीं
अशीच तूं येतेस अवेळीं
मी असण्याची शुद्ध हरवतां
मला न कळतां, गवसतेस पण
दुबळ्या हातून सुटून जाते
तुझी विजेची लख्ख पाकळी
अशीच तूं येतेस अवेळीं

३०–१०–५७

* * *

## वैशाखाच्या ऐन दुपारीं

वैशाखाच्या ऐन दुपारीं
होइ उन्हाचा पारा पातळ
आणि सांवल्या डुंबत होत्या
सोडुन आपुला काळा अंचळ
ढगा ढगांच्या कबूतरांचे
पंख सारखे होते पिंजत
निळ्या नभाच्या तवंगावरीं
कोणी होते विहग तरंगत
वैशाखाच्या ऐन दुपारीं
वारा आला जुना पाहुणा
हळुच कुणाचीं घरें शोधितो
ओळख त्याची त्यास पटेना
वैशाखाचा ' थाट ' पहाया
वळिव सरींचें झरतें पाणी
या वाटेनें उद्यां जायची
वाजत गाजत वर्षाराणी

१९५९.

* * *

## रात्र करी यात्रा

गोरज मुहुर्ती– घरीं वाजे झांज
मंदीच्या पायानें– आली तिन्ही सांज
ढगाच्या भितींत– झरोके काढिले
गुलाली भिगानें– जणू मढविले
त्यांतून वाहते– संध्या दूरवर
केव्हां कसा येतो– सखा प्रियकर
प्रतिक्षेची तिच्या– झाली परिसीमा
व्योमधरेच्याही– काजळल्या सीमा
गर्भित दुःखानें– जाहली व्यथित
निगूढ डोहांत– विरेना पर्वत
शेवटीं एकटी– मनीं कंटाळली
महानुभावाचीं– वस्त्रें ल्यालीं काळी
अध्यात्माचा बुक्का– लावून कपाळीं
रात्र करी यात्रा– अशी रानोमाळीं

१९–१०–५७

* * *

## प्रीत तुझी माझी

प्रीत तुझी माझी
नारळाचें पाणी
कवचाला कठिण
गाभ्यामधें पाणी
प्रीत तुझी माझी
तीर तलवार
नाहीं कुणी केला
कुणावर वार

प्रीत तुझी माझी
रान पांखराची
जशी पाडसाला
ओढ वासराची
प्रीत तुझी माझी
निकोप निर्मळ
जीवीचें जीवन
झालें गंगाजळ
प्रीत तुझी माझी
आसक्ती विरक्ती
मीरा मस्तानीची
मुक्ती आणि भुक्ती

१-११-६१

* * *

## रंगखुणा

चांदण्यांत खुलणारी
अपरूप तव रूपकळा
पाहुनिया मन पीतें
भाव तुझा गडद निळा
मुक्त केशपाश तुझा
राहूं दे सखि असाच
दडलेल्या चंद्राला
अधरांची अधिर आंच
चंद्रावर सूर्याचें
कमळ निळें नेत्र खुलें
रक्तदाह अंगारुन
सोडितात किरण कळे

टचटचत्या कायेवर
मोहरी ही मोहरते
स्पर्शाला स्पर्शाचें
आवाहन करिल रितें
त्या पूर्वी भारावुन
सिद्ध होइ विद्धपणा
बावरल्या रंगांतच
दिसति मला रंगखुणा

२३।५।६१

* * *

## नवें पाणी

इंद्र आला आभाळांत –
सवें त्याच्या ऐरावत
अभिप्रेरी वज्राघात –
करावया राजपथ
केली लखलख त्याच्या –
किरिट नि कुंडलांनीं
बिजलीचा स्रोत जसा –
हिरे आणि हिरकणी
झाली झाली नभोवाणी –
आतां आलें नवें पाणी
घन–गज–शुंडांतून –
कारंजांची जलदाणी
नवसाचें नवें पाणी –
जमिनीची झाली न्हाणी
पिंपळाच्या पानांतून –
ठिपक्यांचीं गोड गाणीं
कोरड्या त्या हृदयाच्या –
रेघा भेगा मावळल्या
उगवत्या तृणांच्या त्या –
माना वर डोकावल्या ॥
घामेजल्या कर्षकांची –
आतां व्हायचीच पेर
दयामय सिंचनानें –
देव त्यांना देई धीर
पर्ण–पाळण्यांत उद्यां –
कणसें तीं झोंपतील
हातपाय त्यांचे सदा
दुधामधें भिजतील ॥

१८।६।५८

* * *

## अंगारा !!

मी आलों तुझिया द्वारां
लाविला तुझा अंगारा
ही रक्षा काळीकबरी
मी ज्यांत पाहिली शबरी
ही रक्षा जळकी माती
की दक्ष–यज्ञिची शांती
घेतलें जिनें जाळून
हें सर्वस्वाचें दान
लावितों कपाळीं रक्षा
त्यागाची जीवन दीक्षा
तूं दिलीस करुणागारा
हा दिव्य तुझा अंगारा.

* * *

## पिंपळ

ही जगण्याची विराट ईर्षा
जगवित होता जुनाट पिंपळ
नैराश्याचे पिवळे झडतां
मनांत उबवी हिरवी तळमळ.
ताठर त्याचा डौल त्या सवे
सहस्र शाखा हात भगीरथ
मायेचें माहेर तयाचें
निळ्या नभावर उंच मनोरथ.
सत्य आणि शिव सौंदर्याची
भूगर्भातून दीक्षा घेई
जुनाट पिंपळ अजुन वाटतो
आशादायी ! आशादायी !!

१९।५।५९

* * *

## श्रावण

मेंदी झाली ओली        श्रावण हिरवा
पीतसे सारखा        मदिर गारवा
ओठ ओले चिंब        वाळावेत कसे ?
श्रावणाचें ऊन        नवनीत जसें
पारवें हिरवें        वज्रचुडेदान
अबदागिरिचा        अभाळास मान
पंचपल्लवांच्या        ढाळिती चवऱ्या
वृक्षांसह वेली        नवीन नवऱ्या
झळाळति मीन        कषाय जळांत
स्वातीचे शिंपले        लपले तळांत
गेंद सुगंधित        पानांच्या द्रोणांत
गाई पान्हा देती        हिरव्या तृणांत
घुमे केवड्यांत        सोन्याचें कणीस
दवणा मरवा        सुवास आंबूस
मंगळागौरीची        पूजा घरोघर
नव दांपत्यांचा        बहर कहर
आतां प्राजक्ताची        श्रावण सकाळ
महादेवासाठीं        आलें बिल्वदळ
नागपंचमीला        घरीं आला नाग
बंशवेलीवर        फुलो फुलबाग

३०–६–५८

* * *

## तूं आलिस तेव्हां

तूं आलिस तेव्हां
तुझ्या पदस्पर्शानें

घर पुलकित झालें
केवळ चैतन्यानें
भिंतीच्या ओठीं
फुटली संगमवाणी
किती दिवसांची तीं
जुळलीं अपुरीं गाणीं
अनुराग गासि परि
त्यास ताल त्यागाचा
शृंगार मंचकीं
कळस मधुर भक्तीचा
तूं तुडुंब भरलिस
धुंद चारुगात्रांत
हा डोह कसा मग
यावा करपात्रांत ?
तव वज्रचुड्याचे
समर्थ हिरवे हात
मज धीर द्यावया
झाले धीरोदात्त
तूं दिलीस दीक्षा
जीवन संघर्षाची
संग्राम राणि तूं
असार संसाराची
तूं आलिस तेव्हां
ालें वैभव सारें
किति वेंचु सांडले
चंद्र सूर्य घरिं तारे

१५-७-६२

* * *

## शिल्पकार

माझ्या व्यथेची ही व्यथा
कशी सांगते कहाणी
माझ्या पापणींत आहे
आर्त श्रावणाचें पाणी
मी तापतों असा कीं
तिथें ग्रीष्म व्हावा थंड
साऱ्या सोंग ढोंगांची या
मी फोडितों उतरंड
माझ्या मार्दवांत आहे
नेणेवेची झळकळ
मला सदा सर्वकाळ
कसें लागतें जिभाळ
मन मातीचेंच आहे
त्याला आकार विकार
प्रभो ! मनांत या ठेवा
सदा जागा शिल्पकार

४ । ११ । ६१

* * *

## वंशदिवा–

निवळलि अभ्रें–आता थोडी थोडी
आलि आभाळाला–नव्यानेंच गोडी
सरता अश्विन–राजवाडी ऊन
दूध काय आलें–मोति–शिपांतून
काळ्या मातिमधें–मुरलेली ओल
आतां याच्यापुढें–मजेंत सुकेल

उभी राहिलेली–म्हाणिमधे वेल
सुगंधी धुंदित—केस वाळवील
फुलांफुलांवर–नवी टवटवी
अशी माझ्या अंगी–वाटते फुलावी
निळ्या पाण्यावर–सख्या सर्वजणी
मेंदिच्या हातांनीं–धुवितात धुणीं
नागपंचमीच्या–ताज्या आठवणी
माया माहेराच्या–अमृताच्या म्हणी
सासरि कार्तिक–सदा उजळावा
करा चिरंजीव–देवा !! वंशदिवा !!

१४।८।५८

* * *

## आकाश स्वत: मी व्हावें

चंद्राची अत्तरदाणी
आकाश मोगरा फुलला
मोगरा तुझ्या वेणीचा
त्याहून सवेग फुलला
भांगाची चंदन रेषा
मज दिसली भिजल्या रात्रीं
करपात्रीं माझ्या आली
पौर्णिमाच चारू गात्रीं
तो चंद्र छातिवर घ्याया
आकाश स्वत: मी व्हावें
त्या मिटल्या ओठांनाही
कधीं अमृत प्यावें ठावें

२३–५–६१

* * *

## दाणापाणी

कृपावंत होऊन दयेनें–
गहिंवरलें आभाळ बरसतें
रिमझिमणाऱ्या तराण्यांतुनी
मैफिल ही मातिची बहरते
अपूर्वा चा पूर नदीचा
गढूळ भगवा कांठ किनारा
भगव्या या पाण्याच्या झोळित
त्रैलोक्याच्या जमल्या धारा
दत्त दिगंबर जमीन काळी
भस्मलेप चिखलाच्या अंगीं
या भस्मांतुन साफल्यानें
गवत उगवतें बारांशिंगी
पानांचे हे मोर पिसारे
तुरे तृणांचे भिजून गेले
दरींगिरींतिल माया पाझर
उल्हासानें आज झिरपले
आषाढाचा जिता जिव्हाळा
श्रावण त्यावर करि निगराणी
मानवतेच्या चोंचित भरते
भविष्यांतलें " दाणापाणी "

१६–७–६२

* * *

## प्राची

पांचूचा हिरवा चुडा, हळदिच्या हातीं
मेंदिच्या आरतिस, अंगुलिच्या फुलवाती

घर आपुलें सोडुन आलिस जेव्हां घरिं या
तूं होउन आलिस सौभाग्याचा दरिया
पद उंबरठ्यावर पडतां आगमनःचें
काष्ठांना फुटले अंकुर कल्पलतेचे
पायांत जोडवें चंद्राच्या चांदीचें
शब्दाविण गातें गीत तुझ्या नांदीचें
वेदासम चारी झाल्या चारी भिंती
तूं वेदवती तुज सवे संहिता गाती
तव कुंकु कपाळीं मज सम अनुरक्ताचें
व्रत उजळूं ये चल नित्य वैश्वदेवाचे
बांधिले मणी मी मंगल मंगलसूत्रीं
चिरबंधनांत या झालिस तूं सावित्री
रात्रींचा आहे कैफ तरी–केसांत
उगवं दे प्राची मंद मदनपाशांत

२१–८–६१

* * *

## " अलका "

कोरांटीच्या रंग दलावर
रोमांचांचीं उठली टिंबें
कायेच्या दर्पणांत दिसतीं
प्रतिकृतीचीं किति प्रतिबिंबें ?
रूपायतनीं मला अडविती
ओठ कळ्यांचे रंग सुरंगीं
रसगंधाचीं धारानृत्यें
बरसतात हे अलक–अनंगीं

२४–५–६१

* * *

३८०५९ काव्य
१९३० १०/६/६८

## एकच थेंब

मनमोराच्या
पिसाऱ्याच्या
लाख डोळ्यांनीं
मी बघतों तुला
तुझे दोनच डोळे
— पुरेत मला

अंतरींच्या
पुरुषार्थाच्या
सहस्र हातांनीं
धरूं बघतों तुला
तुझे दोनच हात
— पुरेत मला

रोमरोमीचें
शराब–पाणी
सांडून मी रिता झालों
तुझा एकच थेंब
— पुरे मला

६–११–६०

* * *

## चिऊताई !!

चिऊताई ! चिऊताई ! पावसाळा आला
चिरेबंदीवाडा तुझा, तयार कधिं झाला ?
उंच हिरव्या झाडांवर, तीन ताळमाडी
माडीमध्यें आंथरलीस, कापूस अन् काडी
पराच्या त्या गादीवर, पंखाविना पिलू

काळजी तुला त्याची, चारा काय घालूं
चिऊताई ! ! चिऊताई ! ! पावसाळा आला
स्वस्त झालें पाणी, दाणा महाग झाला
दाण्यासाठीं कुठेहि तूं, घुसतेस बाई
धीट अशी होते लेकरांची आई
लेकरांची आई, जगाहून थोर
जग तुला म्हणते, चिमणीची ही पोर

८-६-६१

* * *

## हुरूप !

कार्तिकी उन्हात–वाटतें तापावें
चावऱ्या थंडीला–वाटते जपावे
पायिं हिरवळ–सुगी ही नवेल
पाणंदा वरती–रांगे रानवेल
गाईच्या कासेंत–दुधाचा उभार
घरच्या माठांत–लोण्याचे तुषार
साऱ्या हिरव्यांनी–धरिला आकार
सुरंगी फुलांचा–फळांचा बहार
गेंद सुवर्णांचे–झेंडू शेवंतीचे
काळ्या मुशींतून–वर यावयाचे
गोफणि गुंगति–गर्द शिवारांत
अभंग रंगती–रामप्रहरांत
सारे सारस्वत–इथें मूर्त-रूप
अहो अमूर्ताला–येतसे हुरूप

२४-१-५९

* * *

"थंडीच्या मनांत-"

## " गुलाबी गुपित "

कार्तिकाची कन्या-थंडीही लाडकी ।।
दवांची रांगोळी-पानांवर रेखी ।।
निरभ्र नभाचा-नेसुन अहेर ।।
पडली पहांटे-घराच्या बाहेर ।।
कावऱ्या बावऱ्या-चावऱ्या वाऱ्यांत ।।

अनवाणी पाय-अडखळतात ।।
गारठलें धुकें-करें सावरीत ।।
निघालि ही कुठें ? रामप्रहरांत ।।
रजई दुशाला-घोंगडी कांबळी ।।
टाकुन देउन-सडीच निघाली ।।

मफलर तरी-बांध कानावर ।।
घाल लोंकरीचा-स्वेटर झंपर ।।
गरम चहाचा-घेतेस कां डोस ?
चौकस चुलीची-विचार नी पूस ।।

जिवाभावाचीच-हवी येथें ऊब ।।
कृत्रीम उपाय-सारे तकलूब ।।
किरणांची ऊब-आहे मी शोधित ।।
थंडीच्या मनांत-गुलाबी गुपित ।।

जानेवारी १९५९

* * *

## " रसिकता "

कांटयांमधला नको गुलाबहि
सदाफुली मज सदा हवी

दुपारचे तें ऊन नको मज
सुरम्य संध्याकाळ हवी
संगीताचें गणित नको मज
त्रितालांतली तान नवी
गळचांत भिजल्या मायेची त्या
ओवी जात्यावरिल हवी
शास्त्र आधिं कीं जीवन आधीं
रसायनांचे कुणी कवी
ओज तेज संपृक्त अशी ती
प्रसादवाणी मला हवी
कलाबतू ती वाट नको मज
अवघड ज्यावर नक्षि नवी
सहजसिद्ध ती सहज प्रवृत्ती
माणसास या सदा हवी
तिरकस डोकें सदा कुणाचें
सरस निरस वा विरस किती
रसारसांतिल समरसतेला
सहजसिद्ध रसिकता हवी

८ । ११ । ६०

* * *

## मणिकांचन

चांदीच्या सशाला
डोळे माणकाचे
जळीच्या माशाला
अंग मोतियाचें

मोराच्या पंखांत
सोनेरी वखांत

जडविले कुणी
निळे रत्नमणी
हिऱ्याचे ठिपके
कातडें चंदनी
कांचन मृगाची
जुनीच कहाणी
हिरवे पिवळे
पांच पुष्कराज
डोळ्यांत वाघाच्या
पाहा वनराज
विस्तू झळाळतो
मांजर डोळ्यांत
मांजराचे डोळे
बघा अंधारांत

२७।५।६१

* * *

## अस्फुटतेंतच अधिक रम्यता

विरळ धुक्याची तरळत पिंजर
त्यांतच पडलें होतें झांजर
नभांत फुटलें ओलें अंजिर
पुसट जांभळी पुसट भव्यता
अस्फुटतेंतच अधिक रम्यता
दूर टेकड्या निळ्या सोंगट्या
काने तरुवर वर वेलांट्या
वाऱ्याच्याही किति कोलांट्या
अबोध ज्यांतिल परिमलमयता
अस्फुटतेंतच अधिक रम्यता

वावटळीच्या उघडया फुगडया
धूलीच्या घुमसत्या शेगडया
पानांच्याही हलत्या पगडया
पुष्प दिसेना दल झाकळतां
अस्फुटतेंतच अधिक रम्यता
तलम साडिचा पातळ बुरखा
अस्फुट आंतिल सुळका विळखा
तुझ्या रुपांतहि मुग्ध चारुता
अस्फुटतेंतच अधिक रम्यता

२ । ११ । ५७

*　　*　　*

## रस

जीवन जाहलें नीरस
मला द्या रस मला द्या रस

रोजचि हमाली चालली चालली
शमते तापुन पोटाची काहिली
परंतु चुकेना चवलि पावली
हिशेबांत सारा विरस विरस !!

कुणी कारकून कुणी ऑफिसर
कुणी आहे शेर कुणी पावशेर
ज्याचें त्याचें वजन स्थिर वा अस्थीर
खालिवर होतो निकषाचा कस

बदलतों आम्ही रोज मुखवटे
दांभिकपणाला फुटतात फाटे
कधीं फळ येतें कधि येति कांटे
कधि कंठि येते कठिण साहस

मिळेल कां रस शेजारीं बाजारीं
विरस जीवन विरस संसारीं
समरसतेच्या अभावानें सारी
ठणकत आहे खरी नसनस

७-११-१९५६

*    *    *

## भीती जेव्हां दारीं येते

कृष्णघनांच्या अजगराच्या
वेटोळ्यांचा डोंगर झाला
निथळ निळ्या पोकळींत
घनत्वाचा थर आला

भरल्या घरांत वरल्या थरांत
चिटपांखरू कोणी नाहीं
विषादानें व्याकूळ झाल्या
कुमारिका दिशा दाही

प्रणयरंग पुसून गेला
तांडवाचा थाट आहे
वज्राघाती विजेला त्या
थरथरणारा घाट आहे

गरजणारी बरसणारी
भीती जेव्हां दारीं येते
घरीं तेव्हां आलिंगनांत
दिठी दिठी एक होते

२२-५-६१

*    *    *

## ओली माती –

वाळल्या मातीची ओल ती सखोल
काळ्या कस्तुरिचा चिखल चिखल
मदन दहनीं ग्रीष्माला ये कढ
पवित्र भस्माची आतां धुळवड
यमुनेचा लोंढा आला पाणथळा
रांगतो भूमीला कृष्णकांत काळा
दरीं डोंगरांत काळें शिलाजित
हत्ती जणुं आले मस्त यौवनांत
नदीच्या कांठाला ओघळती राड
जळाच्या लग्नाला मातीचें वऱ्हाड
काळ्या वावरांत काळ्या खापरांत
सांचतो उद्यांचा दहि, दूध भात
तृणांच्या बाळांचा– माउलीला ळळा
मायेवीण कशी यावि जीव कळा ?
माहेरचि आज अंगि चंद्रकळा
मोत्याच्या झालरी उद्यांच्या पातळा
कमळ खुलतें पंकांत रंकांत
कर्तृत्व रुजतें दारिद्र्य दुःखांत
मातीचिच होते गणपति – गौर
देवाहून आहे ओलि माती थोर

६–७–५८

* * *

## अश्रूंचे यात्रिक

अश्रूंचे यात्रिक हे
मळवितात पायवाट
पळतिल किति ढळतिल किति

दूर किती बघुन घाट
अश्रूंचे यात्रिक हे
मायेचे मांत्रिक पण
जादूनें उभवितात
ते परमानंद भुवन
अश्रूंचे यात्रिक हे
अश्रूंची सोबतीण
दुःखावर घालितात
सौख्याची मधुर वीण
अश्रूंचे यात्रिक हे
अश्रुफुलें पूजितात
भाव सधन जीव दशा
जगवितात जीवनांत
अश्रूंचे यात्रिक हे
मरणाला हसवितात
त्यास देइ उत्थापन
अश्रूंचा अमर हात

७–११–६०

* * *

## दीपमाळ

इंदोरी, साडि चंदेरि, रंग अंधारी
गुणवती निघाली गंधवती गलनारी
चालतें बोलतें कारंजे हें झुलतें
बरसाती यौवन कांतींतुन रिमझिमतें
ते नितंब जणुं कीं कदंब डेरेदार
वरि झगमगणारी पट्टीदार किनार
पदिं पैंजण झुमकेदार बदामी पाय
मेंदिची गोठली रंगदार वर साय

त्या कमळ फुलांची जुगलबंदि बंदिस्त
पदराचा पिंगा चाले त्यावर मस्त
पापणिचें तोरण हलवी काजळ दोरी
त्या बुबुळ मंचकीं नाचति काळचा पोरी
गालिचे तळें हें त्यांत चिमकुली होडी
होडींत दोन या रसवंतीच्या फोडी
मखमली मुलायम काळा केशकलाप
त्यावरती उठला फुलवंतीचा छाप
कायेवर नाचे कथ्थक मदन–विलास
तूं शृंगाराचा गासो भीमपलास
तव दीपमाळ देहाची पेटून गेली
लागली हाय कितिकांना जाळून गेली

५–४–६१

* * *

## झोका

पळूं लागले मेघ त्यासवें
वाऱ्याचाही वेग
आज पहांटे क्षितिजा वरती
थरारली बघ रेघ
गर्भवतीच्या मंदपणानें
ज्येष्ठ घेतसें रूप
निवला आतां जळणारा तो
माती मधला धूप
मातीच्या पाळण्यांत आतां
खेळतील अंकूर
शिडकावाच्या शत धारांनीं
झोका गेला दूर

२५–५–६१

* * *

## मोरपंखी

प्रकाशाचा पंखा
पावणीच्या हातीं
दृश्य सुख हालें
तिच्या दृष्टि पथीं
वैशाखाच्या मार्गीं
मोरपंखी दुपार
वाऱ्याच्या त्या पालखीला
सुगंधाचा भार
गुल्मोहर कुंकवाचीं
रांगोळ्याचीं चित्रें
पायाखालीं गळलीं
शकुंतलेची पत्रें
मंद मातट वास
तापुन तापुन धुमसत आहे
वावटळीच्या चक्रवेगांत
कणाकणाची कसरत आहे
वेगवेडे माझें मन
हलके फुलके पीस व्हावें
मोरपंखी आ ाळाला
वर जाऊन चुंबुन यावें

२२–५–६१

* * *

## कळि होता फुलराणी

कळी होता फुलराणी
दाटतां पराग आंत
हिरव्या त्या पानांवर
गीत होई ऋतुस्नात

दाटतांच मुग्धपणा
फुटशिल तूं आंत आंत
• वाहिन मी फुलतांना
लपवि मला पाकळ्यांत

२३-५-६१

*　　*　　*

## असत्य सत्य

जन्मांतच मृत्यू लपला
जरि ठावें आहे सकला
विस्मृतिच्या पडद्याखालीं
हा मानव आहे जगला
अद्याप मरण जर नाहीं
ही अवेळ साधुन ध्यारे
साध्याविण साधन करणें
कुणि जीवन त्यास म्हणारे
अज्ञात कितिक तीं दुःखें
कवटाळू सौख्य म्हणून
शहाण्याला संभ्रम झाला
गुरफटला कोळी विणून
मग हसणें रडणें सारे
मज नाटक वाटत नाहीं
हें असत्य सत्य म्हणाया
मज दिक्कत वाटत नाहीं
हें असेच जीवन जगतें
विस्मृतिच्या बुरख्याखालीं
मी रोज तपाशित बसतों
ओठांची कृत्रिम लाली

१३-८-५९

*　　*　　*

## वाटतें मला मी फसलों

आभाळ चिलखती सारें
सर्वांग लपेटुन बसलों
अद्याप घाव मज बसती
वाटतें मला मी फसलों
जळवंती जळभक्तीची
मी पाणकळेंतुन प्यालों
हिवताप कुठुनतरि भरतां
वाटतें मला मी फसलों
शत गरुडांच्या पंखांनीं
मी स्वैरपणानें भ्रमलों
बेड्या न परंतू तुटल्या
वाटतें मला मी फसलों
कणकणांत गंधकळ्यांचा
शृंगार पांघरून बसलों
निर्माल्य कुठेंतरि कुजतां
वाटतें मला मी फसलों
क्षण अमृत थेंबासाठीं
मी देवा ! आहे जगलों
विष त्याहुन अधिकच उरतां
वाटतें मला मी फसलों

३०-५-६१

* * *

## रुप्याच्या सुपांत

रुप्याच्या सुपांत
सोनें पाखडीन

...६

वज्र चुड्यांचे हें
मला वरदान
मांगल्य ओविलें
मंगळसूत्रांत
बांधिलें पावित्र्य
पुरुष सुक्तांत
केवडा वेणीचा
तुझ्याच कीर्तीचा
तुझा स्नेह प्यालें
रतीच्या प्रीतीचा
तूंच नटराज
रंगमंचावर
वीट प्रपंचाची
करकटांवर

९।११।६०

* * *

## अंतर

हें आकाश पाहून
तुझ्या अमर्याद
अस्तित्वाच्या
किमान मर्यादेचा
मला थोडा तरि अंदाज येतो
हें पाणी पाहून
गूढ सागराला मिळणाऱ्या या
जळभक्तीनें मीही थोडा प्रवाहित होतों
परंतु
आकाश आणि पाणी

ज्या वेळीं मी एकत्र पहातों
त्या वेळीं मला तुझा
साक्षात्कार होतों
पण
हें जड शरीर
तुझ्यामाझ्यामधें
क्षितिजासारखें
अडवें पडल्यामुळ
तुझ्यामाझ्यांतिल ‘ अंतर ’
आजतागायत
आहे तें कायमच ! !

६–५–५९

* * *

## ‘ उदयाचें फूल ’

नीलकांत चंद्राचा डफ वाजे चांदण्यांत
ज्योत्स्नेचा जिप्सिला नाचविते धुंद रात
धरतीच्या मातीवर गीत तिच्या प्रीतीचें
पाझरती स्वप्न कलश रतिवेडया इंद्राचें
दूधसागरास मिळे पाण्याची पुण्याई
विस्कटल्या वेणितुनी साठविल्या जाइजुई
वाऱ्यावर विरलेलें अत्तर ही चंदेरी
झाडांच्या हत्तीवर पानांची अंबारी
क्षितिजाच्या कांठावर हात तिचे झुकलेले
हातिं तिच्या उदयाचें नकळे कुणी फूल दिलें

१५–७–६२

* * *

# मी आणि तूं

माझ्या अंतऱ्याला
तुझें ग धृपद
सदाकदा यावें
तुझें पालूपद
माझ्या मुखकमळीं
तुझी नामावळी
माझी संध्यापळी
तुझ्या गंगाजळीं
माझी ग अन्योक्ती
तुझी अपन्हुती
माझा मंत्रघोष
तुझी पूर्णाहुती –

९–११–६०

* * *

# समर्पण

सूर्याचाच अंश
मानवाचा वंश
स्वतःच जळावें
जग उजळावें
पुष्पाच्या जीवनीं
गंध आराधना
मंद निर्माल्यांत
संपते साधना
उरांत फुटावें
जळानें उठावें

जीवीचें जीवन
कुणी तरि प्यावें

२–४–६१

*    *    *

## ये अशी

ये अशी ! ये अशी !
अनुप्रास क्षितिजाचा साधित
ढगा ढगांच्या प्रतिमा रेखित
काव्य गुलाबी येतें उधळित
उषा उगवती जशी –– ये अशी
चित्र रूपता घे चैत्रांतुन
स्नेह विव्हळ तो ओला श्रावण
जळ बिंदूंचे बांधुन पैंजण
वर्षा येते जशी – ये अशी
गर्भ रेशमी पराग कण ते
गंध गीत पाकळींत भरतें
फुलून हंसते हंसून फुलते
फुलराणी ती जशी –– ये अशी
स्वयंरूपसी तूं वासंतिक
उत्प्रेक्षालंकारहि कायिक
लेवुन येते सर्व अनामिक
आलि जशी उर्वशी – ये अशी
सप्तपदीची उदात्त शिकवण
हळद सरे परि हळदीचें मन
आहे तोंवर त्याच पाउलीं
लक्ष्मी येते जशी – ये अशी

१९–१०–५७

*    *    *

## जिद्द

ईर्ष्येच्या दोरानें – उडाला पतंग
नवीन कागद – नवोनव रंग
क्षणांत गिरकी – क्षणांत मुरकी
अहंतेची लय – वाढते सारखी
क्षण असा येतो – येते वावटळ
पुन्हां खालीं येणें – असतें अटळ
मोडती कामटचा – पतंग फाटतो
ईर्ष्येचा सुताडा – आटतो तुटतो
पुन्हां नवा दोरा – पतंगही पुन्हां
निराशेच्या पोटीं – आशा हाच गुन्हा
पुन्हां काटाकाटी – पुन्हां फाटाफाटी
जिद्द मनाचीच – धरिते चिकाटी

२०–११–५७

* * *

## छेद

जगीं मोठमोठे पर्वत पाषाण
कुठेंतरि माझा मृत्तिकेचा कण
विश्व वाङ्मयांत एक अनुस्वार
तसें या संसारीं माझें घरदार
तरी मला आहे किति अहंकार
माझा मीच केला विरूप आकार
सत्यशिव यांचें सौंदर्य अपार
भागून भागला माझा भागाकार
कधीं पूज्य बाकी आली नाहीं देवा।
माझा मला आतां असा छेद जावा

१–७–५९

* * *

३८०५८ १९३० १८/५/६७

# थंडी

थंडी हुडहुड, दांतीं कडकड
झांकी दहिंवर, उदयाचें गूढ
साखर-झोंपेची, डोळ्यास झापड
पहांटेचे पाय, त्यांत पुन्हां जड,
वारा होई हूड, फेंकि गंध-पूड
पेटे शेकोटींत, गवताची चूड
किरणांचे येती, हळु हळु हात
वाटतें उन्हांत, बसावें मजेंत
पुन्हां हुडहुडी, अंगांत भरते
गुलाबी चहाला, न्यारी चव येते.

१५-१२-५८

* * *

# अशीच सुंदर रात्र असावी

अशीच सुंदर रात्र असावी
त्या रात्रीं काळोख नसावा
अष्ट दिशांच्या आठ करांनीं
चंद्रनळा सारखा उडावा
अशीच सुंदर रात्र असावी
गूढपणा गर्भांत असावा
जाईजुईच्या पिचकाऱ्यांना
मस्त हवेचा दाब असावा
अशीच सुंदर रात्र असावी
रत्नमण्यांचा मोर दिसावा
व्योमविशारद सखे शारदे !
बीन तुझा चंद्रांत असावा

आरस्पानी नग्न निळाइत
जलविहार आकंठ करावा
भिजतां गोपी दाट घनांच्या
कदंबावरीं शाम असावा
नक्षत्रांचीं विराम चिन्हें
शब्दांना आराम असावा
शब्दांच्याही पलिकडे त्या
तुझा नि माझा भाव असावा

२०-५-६१

* * *

## तीर्थ

अभंगाच्या स्पर्शांतून
काया झाली वीणा टाळ
हृदया मधल्या स्पंदनाचा
मृदंगाचा अमृत ताल
गुलाबाचा आहेर देतां
मीच सख्या गुलाब झालें

सुखामधलें दुःख म्हणून
कांटे मला छळून गेले
जीवनाची चंद्रभागा
महापूर आले गेले
सौभाग्याच्या भाग्यानेंच
माझी मीच तीर्थ झालें

२२-५-६१

* * *

## तळें

वर आभाळ काळें निळें
तसेंच खालीं कां हें तळें ?
पडछाया या पडत असतात
जिवाभावाच्या नात्यामुळें
रंगित पालखी इंद्रधनूची
क्षितिजावरती भिजत आहे
पालखी सोडून पालखीवाला
पावसांत कुठं भिजत आहे ?
वर नाहीं खालीं नाहीं
फक्त कमळें गडद जळांत
हिरव्या गार गोल गंजिफा
कमळपानें झिरमिळतात
फुर्रर्र वारा वहात होता
झिम् झिम् पाण्यांत उठत होती
त्यांतच पाउस धार नव्हे
तारेस तार जुळत होती
मीहि पावसांत भिजतां भिजतां
भावहि झाले व्यापक निळे
पडछाया या पडत असतात
जिवाभावाच्या नात्यामुळें

२२–७–५९

* * *

## रंग

हंसण्यापेक्षां कधीं कधीं
रडणें मला प्यार आहे
वसंताहून ठिबकणारी
आषाढाला धार आहे

सुखापेक्षा दुःख अधिक
दुःखच मला जवळ आहे
मोहळ घेतां मधमाशांचा
दंश वेड्या अटळ आहे

घेण्यापेक्षां देण्यासाठींच
हात माझा सढळ आहे
कुटील व्यवहार म्हणतो हा तर
अर्धांगाचा चळ आहे

छक्के पंजे करणाऱ्यांचें
बहुरूप्यांचें जग आहे
सोंग मला साधत नाहीं
अंगांत माझ्या रग आहे

१-६-६१

* * *

## " घांस "

चांदणें कल्हई, चंद्राच्या ताटास
साईचा खुमास, तापल्या दुधास
वोटांच्या कळ्यांनीं जाईच्या कळ्यांचा
कुस्करिला भात अंबेमोहराचा
पहिला वहिला गोविंदाचा घांस
घेई तान्ह्या बाळा घेइ गोड घांस
आकाश पाताळ, हिंडून धुंडून
आणिला काऊनं आणिला चिऊनं
भरवितें तुला त्यांतला हा चारा
नको रुसूं फुगूं प्राणाच्या पांखरा
लोचट माउंची घोंटाळते आस
घेइ गोड घांस, घेइ गोड घांस

माझीं पांचीं बोटें भिजतीं तुपांत
त्याहून ही माझे प्राण चिबतात
दाटे गहिंवर नेत्री दंहिवर
जीव माझा होतो कसा खालीवर
भुकेला कधींचा माझा राजहंस
घेइ गोड घांस घेइ गोड घांस
बागुलबुवा तो यइल रे आला
म्हणतां म्हणतां, देव घरीं आला
याचितो याचक तुझी उष्टावळ
आठवलें त्याला शैशव गोकुळ
देवाला त्या घांस देणार मी नाहीं
तूंच माझा देव ! देवाची मी आई !
वैकुंठहि येते माझ्या दर्शनास
घेइ गोड घांस घेइ गोड घांस

६-१२-५६

* * *

## व्यथा

वाऱ्याची मी मोट
बांधावी म्हणतों
बांधतां येईना
आकाशीचें शिल्प
कोरावें म्हणतों
कोरितां येईना
समुद्राचा घोट
घ्यावा मी म्हणतों
ओंजळ पुरेना
जगाच्या व्यथेची

तडकली कांच
सांधतां येईना
देह टिचभर
मला दोन हात
कशाला पुरेना

६ । ११ । ६०

* * *

## कळूनही तो कळत नाहिसा

एक तोच क्षण
अनुभवतों पण
भेगांतुन मातीचें मी पण
केव्हां येतें हिर्वाळुन वन ?
कळूनहि तो कळत नाहिसा
एक तोच क्षण
अनुभवतों पण
बरसातीच्या धारांपूर्वी
मेघ कधीं येतात तरारुन
कळूनहि तो कळत नाहिसा
एक तोच क्षण
अनुभवतों पण
फुलण्यापूर्वी
फुलण्या नंतर
परिमल भरतो कसा नि कोठुन
कळुनही तो कळत नाहिसा
एक तोच क्षण
अनुभवतों पण
लुकलुकणारे

तारक तारे
बिल्वर कधि निर्मितें निळेंपण ?
कळूनही तो कळत नाहिसा
एक तोच क्षण
अनुभवतों पण
सर्वस्वाला अनुभवतांना
कसा सुखानें होतों उन्मन ?
कळूनही तो कळत नाहिसा
एक तोच क्षण
अनुभवतों पण

३०।१०।५७

* * *

## आई

ती आई ती आई
नवमास मांस पिंडाचा
उदरांत भार जी वाही
रक्ताचें पाणी केलें
डोळ्यांत जिच्या अंगाई
उपवास लाखदां घडले
या फक्त लेकरा पायीं–ती आई ती आई !
पिंडांत ब्रह्म साकारी
ही मायेची अस्ताई
जी आमुच्याच दुःखानें
किति रडली धायी धायी–ती आई ती आई !
भारतीय श्रीकृष्णाची
ही तेजस्वी गीताई
सत्धर्म न्याय स्वत्वाची

हो ज्वलंत दीक्षा देई–ती आई ती आई
विश्वाच्या संसाराला
जगविते जिची पुण्याई
मंगला उज्वला माता
जी वेदांची वरमाई–ती आई ती आई
त्या निरपेक्ष जिच्या प्रेमाला
उपमाच कशाची नाहीं
त्या तिच्याच पाय धुळीनें
माखावी माझी डोई–ती आई ती आई

* * *

## चिरंजिवांस

या चिमण्या चाऱ्यासाठीं
मी रोज वाहतों भार
झुंजार जीवनासाठीं
मी उगारितों तलवार
फुलवात फुलावी इवली
लागोन जरासा वारा
मी स्वतःच होतों तेव्हां
चिरबंदी दगडी कारा
गुण गंध प्रफुल्लित व्हाया
किति रक्त रोज शिंपावें
कीं माझ्या या बाळांनीं
श्री व्यास, वाल्मिकी व्हावें
आदर्श महा पुरुषांच्या
किति सांगु कथा बाळांस
ते निर्भय होतिल तेव्हां
भय वाटावें काळास

मम पंख पिसारा गळला
चोंचित या सरता चारा
चुंबन मला मायेनें
हा विझवा लाल निखारा
व्हा मोठ्याहुनही मोठें
जें मला न होतां आलें
तें भाग्य तुम्हां लाभावें
मग सार्थक माझें झालें

१।६।६१

* * *

## रूप तुझें समजुं दे विराट

अंधाराची मगरमिठी ती
सुटत चालली होती आतां
उगवत होती नवी उगवती
गर्भवती जणुं झाली माता
दंव बिंदूंचे वेंचित मोती
मला भेटलिस पुसटपणांत
उमलत होतां नवा रक्तिमा
अल्लड नवख्या बाळपणांत
तुझ्या नि माझ्या तळहातां
घट्ट घेतलें होतें चुंबन
माझ्या मनिची लक्ष्मण रेषा
कधींच गेलों मी उल्लंघुन
अनोळखी त्या मार्गावरूनी
अनुसरलों मी तुला मुकाट

त्या मार्गावर भेट पुन्हां पण
रूप तुझें समजुं दे विराट

१४-१०-५७

* * *

## स्वप्न तटिनिच्या तटीं

एकटी, एकटी,
पाहिलें तुला मी स्वप्न तटिनिच्या तटीं ॥ धृ. ॥
मोर पिसाऱ्या परी मोकळे
केस तुझे आगळे वेगळे
रजनीचा जणुं अर्क साकळे, स्कंधाच्या संपुटीं ॥ १ ॥
पीत चंद्रमा सुप्रभातिचा
सुखद रंग सखि तव अंगाचा
पदर खोविला जळवंतीचा-झोंकदार कटि तटीं ॥ २ ॥
संध्याकालिन जमवून सोनें
तारांगणिचे लुटून खजिने
त्यांचे कां घडविले दागिने-भाळि बिंदी धाकटी ॥ ३ ॥
कधि शृंगारी, कधि संसारीं
कधि हिमवंती कधि अंगारी
निर्विकार कधि सहज विकारी-कधि नजर चोरटी ॥४॥
संप्रदाय कधि अध्यात्माचा
महामंत्र कधि मानवतेचा
त्वेष केधवा वर्गलढ्याचा-पेटविसी आगटी ॥ ५ ॥
कधि मुरलीरव कधि शिवतांडव
कल्पलतेचा केव्हां मांडव
अपार करुणा भक्तीलाघव-तं तर नवरस उटी ॥ ६ ॥

१०-१०-५७

* * *

## फणी आरसा

गांवशिवेवर एक झोंपडी
भकास अन् उध्वस्तपणांत
बसली होती पददलितांचीं
शोककथा अन् गाणीं गात
सहस्त्र छिद्रांतून तणांच्या
गेलें होतें स्वास्थ निघून
ढिसाळलेली गळली माती
विटा निघाल्या पार फुटून
एक जोडपें तिथें राहतें
जितेपणाचा फक्त पुरावा
रसरसलेला ऊस रसाविण
चिपाटलेला जसा उराचा
टापटिपीची ठीक मांडणी
सुग्रण होती ती घरवाली
जगण्याची ती जिवंत ईर्ष्या
मृत्यूशीं जणुं हुज्जत घाली
सांगत होते जीव दोन ते
जीवन मूल्यावरी वारसा
सौंदर्याची साक्ष तयांची
झोंपडींत त्या फणी आरसा

६–१०–५७

* * *

## शकुंतला

शिशिरामधल्या छायांचे त्या
केस मोकळे ओले लांबट

वाळवीत जणुं बसली होती
कार्तिकांतली सकाळ कोमट
विलायचीची पूड टाकिली
कुणी अशी उनऊन दुधांत
आसवती जणुं भरली होती
तृणांकुरांच्या बाळजिभांत
हिरवे गहिरे निवांत डेरे
पानांचा संसार थांबला
तुरट थंडिनें आज सकाळीं
अवखळा वारा काय आंबला
आभाळाच्या विश्वामित्रा
बससि असा कां भस्म फासुनी
वाढत आहे गर्भ सतीचा
गर्भवती मेनका मेदिनी
श्रावण शृंगाराच्या साक्षी
सांगतात ही चिमणी–चिमणा
संन्यासाच्या संसारांतही
शकुंतलेचा हले पाळणा

३०–१०–५७

* * *

## तीलोत्तमा !

उत्तमांत ती आहे उत्तम, निरुपम तीलोत्तमा
मोहिते मन्मथ पुरुषोत्तमा
जडण घडण किति रम्य चढण ती फणकारुन पाहते
नागिणी जशी फडा काढिते ।।
भांगाची चिरकणी हिरकणी, शिरीं कुणी रेखिली
मेहेरप भालावर आखिली ।।

तिच्या दृष्टीच्या पुष्पवृष्टिची सृष्टि सडा घालिते
कुसुंबी मेंदी ही शिंपिते ॥
लव कानशिलावर हिरवें खस अत्तर
पापणीच्या खवल्यावरी कृष्णकेशर
हा मंतरलेला सुटतो मंथरशर
कच बंधाचा प्रबंध मोहक धुंद फुंद गंधित
मोगरी खंडित हो मंडित
अंबरगत ती कमान कंबर तुंबर कीं झुंबर
माजवी अंचळ अवडंबर ॥
रोमांच्याच्या फुलवातींनीं फुललि सखी कुलवती
मधाच्या ओठांची मधुमती ॥
आषाढीं कुंतल नयनीं श्रावणकळा
मारितो चुळा हा वसंत भारी खुळा
लागला सखीला ऋतुचक्राचा लळा
ऋतुकमळावर अमळ जरासा पदर होइ मोकळा
आणि ती नादविते संबळा

१२–९–६२

* * *

## ''ईप्सित''

अलौकिकाला आवाहन मी
करित सारखा बसलों आहे
अपूर्ततेच्या पोटीं यांतच
मी माझ्यावर रुसलों आहे
हिमालयाच्या उंची इतुका
घाट स्वतःचा रचवित आहे
वाळूचे कण घन कां होतिल

मीच स्वतःला फसवित आहे
तेजस्वी मन करी तपस्या
सूर्य घडावा दुसरा जगतीं
वीजशलाका जमवित असतां
मलाच माझे चटके बसती
वैफल्यांतहि फलश्रुतीचें
स्वप्न कधीं साकार होतसे
घरबसल्या कधि नकळत ईप्सित
मूर्तिमंत आकार घेतसे

१७–६–६१

* * *

## पूर्णविराम

मी एक आभाळांत
कविता पाहिली व वाचली
ती जिथें संपली तिथें–
सायंसूर्याचा पूर्णविराम होता

१९–६–६१

* * *

## चर

सोनें जपतां जपतां
चिंधी जाते फाटून
ओझें घेतां घतां
पाय गेले गोठून
बुद्धी जपतां जपतां
हृदय जातें अटून

हृदय जपतां जपतां
चिखल होतो कुठून
चिखलामधें पाय
खालीं नाहीं धर
उभा राहूं किती
पायीं पडला च

९३०९२
३-११-६०

*   *

## दुपार

उदय अस्ताचा,   उगम संहार
याहून वाटते,   असावी दुपार
नाहीं ऐलथडी   नाहीं पैलथडी
इथेंच रहावी,   नाव माझी सडी
सुख आणि दुःख   हंसणें रडणें
यांच्या मधोमध   स्थितप्रज्ञ राहणें
एवढें जमेना,   करितों विचार
राहील सारखी,   कशी ही दुपार

३-११-६०

*   *   *

## झाली पहांट पहांट

झाली पहांट पहांट
प्रभू पूजेसाठीं आले
नभीं सोनियाचें ताट
झाली पहांट पहांट
लाल मळवट ल्यालें
नभ विराट विराट

झाली पहांट पहांट
झाली मंत्र पुष्पांजली
त्यांचे पानांवर पाठ

झाली पहांट पहांट
अलंकार उत्प्रेक्षांचा
पुष्प काव्यांवरी थाट

झाली पहांट पहांट
घाट वाजवीत गाय
देई अमृताला वाट

झाली पहांट पहांट
सरितांनीं भरियेले
मृत्तिकेचे कांठ माठ

झाली पहांट पहांट
साऱ्या दुरितांची झाली
आतां पूर्ण पिछेहाट

झाली पहांट पहांट
नव चैतन्य भरलें
खालीं वर कांठोकांठ

१०–६–५८

* * *

## आम्ही आहोंत बुद्धिवादी !

आम्ही आहोंत बुद्धीवादी
बीज आधीं किं अंकूर आधीं ।।
चर्चा करू विज्ञानाची
दर उडवूं अज्ञानाची
हीच आहे आम्हा व्याधी ।। १ ।।

बोलूं तोलून, वागूं जोकून
देणें घेणें तराजुतून
आंखीव करूं ऋद्धीसिद्धी ॥ २ ॥
रडण्यालाही बांध घालूं
हंसण्यालाही बांध घालूं
वृत्ती दडपूं सरळ साधी ॥ ३ ॥
तर्कदुष्ट झाला स्वभाव
श्रद्धेचाही आहे अभाव
चिकित्सेचीच उरते रद्दी ॥ ४ ॥

३–१–६०

* * *

## पहांट वारा

जास्वंदीची वेणी घालून
संध्या लाजत उभी राहिली
गडद निळी ओढणी बुट्यांची
तिच्या मुखावर कुणितरि घाली
नयनीं काजळ हातीं पंखा
भिजविति मंचक सुगंधधारा
शिणल्या गात्रीं उत्तर रात्रीं
जागवतो तिज पहांट वारा

३–११–६०

* * *

## " अिंद्रचाप "

दु:खाचा जर अग्नि प्यायचा
मला प्यावया सिंधु मिळूं दे
जीवनकलहीं लाख बाण तर
पृथ्वीअितुकें हृदय होअुं दे

रंग बदलती परिस्थितीचे
मला सखे आभाळ होउं दे
तुझ्या प्रीतिचा अिंद्रचाप पण
हृदयावर त्या क्षणीं फुलूं दे

१६-८५९

* * *

## विष

प्रीति आणि त्याग
यांचा यज्ञयाग
यांतून प्रिये तूं
आलिस कां सांग
स्वयंभू सीतेचें
तपाचें दिव्यत्व
म्हणून रामाचें
गाजलें देवत्व
अठरा औक्षहिणी
अशा पसाऱ्यांत
द्रोण गुरुजींचे
तुला दोन हात
अमृताची वाट
तुझ्या पाउलांत
माझें सर्व विष
संपतें तुझ्यांत

४-११-६०

* * *

## वसंत

मोकळें आभाळ–स्वच्छ शिंपल्याचें
कापशी ढगांचें–पिंजण लोण्याचें
शिशीर पिऊन–चैत्राचें ये ऊन
पसरलें मार्गी–छायांनीं चंदन
कोरड्या मातींत–मातट उदार्क
सांडिला फुलांनीं–तिथें मधुपर्क
आज जळवंती–निर्मळ मवाळ
मौक्तिक वाहवी–कांठचें प्रवाळ
कैऱ्या हिरवट–डाळिंब पिकले
ताठर उसांचे–तुरे ते सुकले
साखर काकडी–टरबूज फोडी
अमृताम्र फलीं–वसंताची गोडी
समृद्धी घेऊन–येतसे वसंत
आम्हांला क्षणाची–नाहीं हो उसंत
उभारी तो तरी–गुढ्या नि तोरण
उद्यांचे न ठावें–धोरण धारण

५–४–५८

*   *   *

## कांतिवर शांत तुळस मंजिरी

कांतिवर शांत तुळस मंजिरी
भरजरी शालु अंगि अंजिरी ॥ धृ० ॥
मृद्‌गंध श्रावण कुंतल लप्फेदार
कचपाशि लकाकुन जाइ नंगि तलवार
तो सूर्य फुलासम अंबाडा भरदार
रतिरूपाचा कोहिनूर सखि सार्वभौम सुंदरी
कांतिवर शांत तुळस मंजरी ॥

किनखाप किरमिजी राजवर्खि तनुवरी
करकचली वांकी मांसल दंडावरी
नक्षिदार मेंदी कोरिव तळव्यावरी
डौलदार पण धीमी धीमी–चाल मस्त–कुंजरी
कांतिवर शांत तुळस मंजिरी ।।

नाकांत मोरणी लख्ख शुक्र चांदणी
लिंबोळि माळ शृंगार साज तन्मणी
मणि स्वर्ण फुलांचा बहार तन्वांगणीं
कानीं लोलकदार झुबे कीं झुंबर रूपांबरीं
कांतिवर शांत तुळस मंजिरी ।।

डोळ्यांत तराणा डोळाभर खळखळ
त्या काजळ रेषा धरिति ताल अवखळ
हृदयांत तुझ्या ग झाली तारांबळ
पायिं वाजती पैंजण जणुं की पहाटेची झांजरी
कांतिवर शांत तुळस मंजिरी ।।

हा घाट मऱ्हाटी दख्खन दिमाख थाट
जो पराक्रमाची तुडवी पाऊलवाट
लावणिस मिळावें अभंग रूप विराट
मदन जळावर कमळा परि हा अवघड गड जंजिरी
कांतिवर शांत तुळस मंजिरी ।।

२५–८–५८

* * *

## सहज असावी अशीच कविता

अंधाराला मंथुन मंथुन
त्या गहनांतून त्या गूढांतून
रंगदार कशि उषा उगवते

उदय–प्रबोधन किती सहज तें
सहज असावी अशीच कविता
मंत्रोच्चारिणी सार्थ संहिता

२६–११–५८

* * *

## रंग बावरी रात्र

रात्र असावी रंग बावरी
ज्या रात्रीवर फिदा चंद्रमा
प्रेमगीत आलेखित बसला
आविष्कारित हृदय नीलिमा
निशिगंधाच्या निद्रेवरि त्या
रातराणिचें स्वप्न फुलावें
त्या स्वप्नांतिल फूल अनामिक
गडे ! तुझ्या वेणींत असावें

४–४–६१

* * *

## शेर

१ एकदांच मी तळहातानें, तुझे स्पर्शिलें केस कांतळी
तेव्हांपासुन या बोटांना फुटे नखांतुन गंध पाकळी
२ चमकदार ते ओठ हिन्याचे, हिन्यांत भिजला पारीजातक
हासुं नको सखि बघतां बघतां, फुटेल गाली सुवर्णचंपक
३ नको मानिनी मान एवढा, मी पण जर हें चिन्ह जयाचें
तुझ्या नि माझ्या पराजयांतच आपण झालों एक दुजाचे
४ वितळूं ये चल आपण दोघे, पार्थिवतेचें होवो पाणी
या पाण्याला अलग कराया, जगांत नाहीं समर्थ कोणी

५ जवळ सारखी बसुन रहा अशि प्राण तुझ्या केलेत हवाली
तूं नाहिस तर या प्रेताला कशी सुचावी गझल् कवाली ?
६ तुझ्याच पायीं वेडे झाले, कित्येकांचे झाले हाल
या वेडांतुन शहजहानें जगीं बांधिला ताजमहाल
७ ज्या हातांनीं फुलें घडविलीं, हात प्रभूचे त्याहून कोमल
त्या हातांनीं तुला घडवितां कोमलतेहुन झालिस कोमल
८ दान दिलें तूं ज्याला अपुलें, त्यास्तव तूं बलिदानहि करशिल
मरणी मरशिल तरी परंतू प्रेमानें या जगांत उरशिल
९ भाग्याची तूं भोगवती अन् त्यागाची तूं तापस मूर्ती
आसक्ती अन् विरक्तिच्या त्या सीमेवर तूं संगममूर्ती
१० पापाचीं हीं पुण्यें करशिल पुण्याचेही करशिल पाप
कळलें नाहीं गूढ कुणा हें तुझा कोणता आहे छाप ?
११ ज्ञानी कुणी वा तत्त्वज्ञानी, विज्ञानी वा असो अडाणी
पोलादाचा पुरुष असो कुणि, घरीं तुझ्या ग भरतो पाणी
१२ मोहाचा तूं डोह सखे ग या डोहाला म्हणती जीवन
तुझ्याच साठीं या संसारीं लोभाचें लाभास प्रलोभन
१३ शृंगाराच्या शोधनांतही, आहे सखि तव प्रेम प्रबोधन
रंगरूप रस गंधा मागुन जिवा शिवाचें घडतें दर्शन
१४ मणि मोत्यांच्या विभूषणांनीं देह तुझा कां अलंकार तो
सहज लाजलिस मला वाटतो, एक खरोखर अलंकार तो
१५ तुझ्या नयनिचा चंचळ पारा, कसा प्यायचा तेंच कळेना
या डोळ्यांचा फुटका प्याला, जोड तयाचा कधीं जुळेना

* * *

## कातर

तुझें नी माझें गीत जुळावें
फक्त त्यामध्यें शब्द नसावा
रंगदार त्या राग समाधित
फक्त स्वरांचा मेळ असावा

दोन मनाचे पराग जुळतां
कितीक गळतिल तलम पाकळ्या
आणिक होतिल करांगुलींच्या
गळ्यांत अपुल्या सोनसाखळ्या
ओठांच्या भेटींत धुमसतां
निश्वासांचा वेग जरासा
आणि वळविला कशा सांठि हा
पराभूत चेहरा जरासा
तुझ्या नि माझ्या एकतेंतही
पडलें सखये कां हें अंतर
अद्वैताला नकळत सखये
लावून गेलिस सलज्ज कांतर

१२-५-६१

* * *

## " चंद्रावळ "

फुलव पाकळी जाईची कळि सुरेख चंद्रावळी
तुझ्या ग मुख चंद्रावर खळी
मदनाच्या मखमली राहुट्या छातीच्या अंगणीं
खुलावट स्वरुपाच्या रंगणीं
अंगावर अष्टगंध किति उधळशील राजसे
अंगि तव बादशाहि बाळसें
गुलाब पानापरी तुझा ग कोरिव डोळा किती
पापण्या त्यास वरून झांकती
सौंदर्याच्या सनइ सुरा परि हात तुझे शोभती
ढोलकी परी पाय वाजती
मानेची तव लटक लाघवी डोळा डावीकडे
जसा कीं कौल देविचा पडे

अतिरथी महारथि पूजा तव बांधिती
किति दौलतजादा भगत तुझे उधळिती
तुजसाठिं पैजेचा विडा कितिक उचलिती
एखाद्याचा विडा रंगतो रंगमंच राउळीं
तुझ्या ग मूखचंद्रावर खळी

* * *

## दृष्टी

इवली पणती
विराट अंधार
मार्ग काळोखाचा
कसा संपणार ?
चंद्र सूर्य डोळे
देशील तूं मला
तरी कां उरीचा
अंधार संपला
व्हाया पुलकित
प्रकाशाची सृष्टी
कधीं यावी मला
दिव्य आत्म दृष्टी

५-४-६१

* * *

## दंव पडलें

दंव पडलें दंव पडलें
पाचूंच्यां पानावर
मोत्यांचे मणि जडले--दंव पडलें

ओल्या त्या मातीवर
ओल्या त्या गंधावर
ओल्या त्या पुष्पांवर
अत्तर कुणि शिंपडलें--दंव पडलें
रंगवती रूपवती
गंधवती रसवंती
व्हावी ती चिर युवती
एवढेंच हृद्गत त्या
थेंबांतुन उलगडलें--दंव पडलें
थेंबांचा चिंब थवा
पानांवर वेद नवा
त्यांचा आस्वाद नवा
पक्ष्यांच्या कूजनांत
पारायण मज घडलें--दंव पडलें

२२-११-५७

* * *

## तीट

आरस्पानी कार्तिकांतली
नवनीताची अंग दुपार
फेकित आली सभोंवतालीं
किरणांचा कापूर अपार
निळेंनिळें आभाळहि त्यालें
झगमगत्या सूर्याची टिकली
निळ्या कपोलीं तीट खुले जणुं
दूर नभांतिल धार धिट्कली

२०-११-५७

* * *

## वरदान

किती भरशील मडक्यांत पाणी
अशी धों धों यावी पावसाची राणी
गाशिल तूं किती किती तुझा सूर
आंत्र वेदनांचा वेगळाच पूर
किति तुझें शिल्प अरे! अल्प किती ?
कैलास लेण्याची कळ यावी हातीं
कृत्रिम किती हे अखूड तोकडे
नको घालूं वेड्या जिवाला सांकडें
फजिती उडेल तुझ्या प्रयत्नांची
जोड हवी त्याला, त्याच्या देणगीची

१-११-६०

* * *

## मी दगडाचा नाहीं !

अभिज्ञान उदात्ततेचें, तरल सूक्ष्म सौंदर्याचें
त्रिकालाबाधित सत्याचें
शिल्प कोरावें म्हणून
मी श्रद्धेचीं, निष्ठेचीं, संयमाचीं
हत्यारें घेऊन कोरायला सुरवात केली
पहिल्या छिन्नींतच माझा टवका उडाला
मी रक्त बंबाळ झालों
आणि माझें मलाच
कळून आलें कीं—
—मी दगडाचा नाहीं

१-११-६०

* * *

## दिवा जळे कशासाठि

दिवा जळे कशासाठीं
फक्त तेजस्वितेसाठीं
आमावास्या घेतें विष
पौर्णिमेच्या चंद्रासाठीं
मृत्तिकेच्या तव्यावर
ग्रीष्म जळें कशासाठीं ?
फुपाट्याचा पांग फिटे
उगवतां बीजपोटीं
दु:ख सारें सोसायाचें
कशासाठीं कशासाठीं
जगावया मानवता
जन्मली जी पाठीं पोटीं

२६–५–५८

* * *

## खय्याम

कलिंगड किर्मिजी, छटा तुझ्या ओठीं आहे
दुभंगल्या दाळिबांत दाण्यांची त्या दाटी आहे
कुंतलाच्या प्रभावळींत स्वरूपाचा खडा आहे
मन्मथाच्या मोहाचा हा, पहिलाच धडा आहे
यौवनाची कलाबूत, कोठें पान फूल आहे
रक्ताच्या या वेलीवर कसली तरी भूल आहे
रसदार द्राक्षघोस, त्यानें भरिलास घडा
मुरलेल्या या मद्यार्काचा, आतां सांडणार सडा
माझ्या मनाच्या खय्यामला, सखे तडा जात आहे
तडा पण सडा नाहीं, त्याच्या सवें घडा आहे

२५–३–५८

...८

३२०५८ ... १६३० ... १८/११

## मना !

भावसंपृक्त मना
किती देशील यातना
ताणशील तार किती
सतार ही तुटेल ना ?
किती रस्सीखेच
किती आचपेंच
गुरूच्या विद्येला
गुरूचाच शाप
भावसंपृक्त मना
किती देशील यातना
निर्मितीचा तुझ्या
नियंताही हो ना !

७-११-१९६०

* * *

## राजवर्खि जांभळा

साडिचा राजवर्खि जांभळा
खुलवितो रंग तिचा सांवळा ।।
कच शिलाजिताचे चमकी काळे भोर
पार्पाणित रुपेरी रेखिव काशीबोर
टकमकते त्यांतच काळें द्राक्ष टपोर
भिवईच्या रेषांनीं कोरिव अपूर्णांक मांडिला ।। धृ० ।।
लव कानशिलांवर निळसर हिरवी काळी
त्या गोऱ्या गोऱ्या गालांना कवटाळी
मणि सप्तर्षीसम कर्ण फुलांची पाळी
अंबाड्याचा रंगित भंवरा गुंगवितो परिमळा ।। धृ० ।।

देहाचें गोपुर कळस दोन मदनाचे
त्याहून प्रलोभन सिंहकटी जघनाचें
ओच्याला पडले होते रेशिम पोचे
कासोटयांतुन किनार पट्टी पायघोळ पातळा ॥ धृ० ॥
जणुं फेकित होते डोळे तिचे गुलाल
तो हलतां झुलतां होता रंगमहाल
कायेवर केली विधिनें काय कमाल
मदालसेच्या नसा नसांतुन मद्यार्काच्या चुळा ॥ धृ० ॥
देखणेपणांतहि तिच्या दक्षिणी शान
विनयाचें मोहक मराठमोळें ज्ञान
अन् कराल कोणी तिचा जरा अवमान
बावळटांनो ! करील तुमचा क्षणांत तो खुळखुळा ॥धृ०॥

३-३-५८

* * *

## तीन तळाची माडी

तीन तळाची माडी एकानं ओंळिब्यांत बांधिली
पायरिस कमळ आणि कर्दळी
मुखचंद्रावर सूर्य चमकती प्रकाश भूमंडळीं
सुगंधित भाळि काळि कुंडली
स्कंधीं गोलाइचा डौल किति डुले मदनमंजिरी
खालि त्या कमान किति साजिरी
कौलारू त्या पाठीखालीं कच्छकिनारी खळे
निर्झरी दरींतून कोसळे
चित्रकार कुणी ठेवुन गेला भिवईचे कुंचले
रंगही ओले प्यात्यांतले
पाहिली सडी मी खडी फडी काढुन
नागिणी अशी ही मंत्रानें भारुन

सोडिली मोकळी कुणी चाळ बांधुन
त्या तालावर बेतालांची शुद्धबुद्ध संपली
रतीची लतिका अनुकंपली

४–९–१९६०

* * *

# करिल ती प्रतिभेचे काजवे

कवळ्या कवळ्या तुळस मंजिरी भिवईवर वाकल्या
पापण्या त्या खालीं फांकल्या
बिल्व दळासम कोरिव डोळे टोकाला निमुळते
पौर्णिमा इथून कां निथळते
ओठांची ती गुलाल पेटी सहजपणें उघडितां
अस्मितेसवें दिससि तूं स्मिता
किति डौलदार तो भांग रांग रेखिव
केसांच्या काळेपणासही मार्दव
थबथबतें त्यावर सुमगंधाचें दंव
मंद धुंद ही योजनगंधा दुजी असावी तर
दुजा परि कुठला पाराशर ?
प्रथम दर्शनीं नयनीं ठसतो उठाव तो छातिचा
निमुळता भाग कटी खालचा
त्यांत पुन्हा पेहराव दक्षिणी दावि 'अवयवाकृती
त्यासवें शील आणि संस्कृती
कंबर कसल्या कासोटचावर वज्राचें मीपण
फेडितें पराक्रमाचें ऋण
गुणवती अशी कुणि शृंगाराची खणी
नवरूप सुरस जणुं प्रत्यक्षच यक्षिणी
शृंगार ढाळिवर प्रीतीची पक्षिणी

फडफडणाऱ्या पंखाचे ते पंख जादुचे नवे
करिल ती प्रतिभेचे काजवे

१८-३-५८

* * *

## माझा भारत देश

माझा भारत देश–जयजय माझा भारत देश ॥ धृ० ॥
गंगा, सिंधू, कृष्णा, भीमा
पुण्याईच्या या परिसीमा
दोहों बाजूला सागर सीमा
संरक्षण वज्राचें देई हिमालयाचा शेष ॥ धृ० ॥

कर्मभूमि ही संगरभूमी
या मातीचे बनलों आम्हीं
मृत्यूशीं झुंझार सलामी
नसा नसांतुन सदा उसळतो रक्ताचा आवेश ॥ धृ० ॥

इतिहासाच्या पानोपानीं
मुत्सद्दी किति राजकारणी
विक्रमशाली वीर नरमणी
त्रिविक्रमाच्या पराक्रमानें भरला देश प्रदेश ॥ धृ० ॥

हा गुजराथी हा बंगाली
हा दख्खनचा हा मल्याळी
कर्नाटक हा आंध्र तामिळी
आहोंत आम्हीं एकच सारे अनेक जरि हे वेष ॥ धृ० ॥

रामकृष्ण शिव प्रताप राणा
तल्वारीसह अभंगवीणा
अध्यात्माचा निस्पृह बाणा
देशासाठीं कुणि न ठेविला लोभाचा लवलेश ॥ धृ० ॥

ज्ञान आणखी विज्ञानानें
परस्परांच्या श्रमदानानें
जागरूक जन जनार्दनानें
जागविला हृदयांत आपुल्या देश एक परमेश ॥ ध्रु० ॥

११-७-५९

* * *

## पडद्यामागें

एकाच बैठकीवरती
तुम्हि आम्ही सन्निध बसतों
आभाळ मिळालें क्षितिजा
हा भासच केवळ असतो
ओलावा ओठिं न पोटीं
तुम्हि आम्ही बोलत बसतों
स्वरताल सज्ज जरि झाला
परि कंठ कुणाला फुटतो
स्तुति करितों परस्परांची
परि सत्य-असत्य किती तें
सोन्याच्या या जडिताला
अधिकाधिक लाखच असते
मोठेंपण ज्याचें त्याला
कितिकांना असतें नसतें
पाण्यांत मिसळलें तरिही
वरच्यावर तेल तरळतें
हीं घेउन सोंगें सारीं
रंगीत सभा संपवितों
त्या पडद्यामागें आम्ही
परि कोण कुणाचे नसतो

* * *

# पिसें

अंतर्मुख होउनिया
पाहिलेंस काय कधीं
आहे मी ओघळ कीं
आहे मी चिर जलधी
अंतर्मुख होउनिया
काय कधीं पाहिलीस ?

गजबजत्या जगताला
नेणारी गूढ वेस ?
पाहिलेंस काय कधीं ?

अंतर्मुख होउनिया
सौंदर्यातीत अशा
अंतरीच्या सौंदर्या ?

अंतर्मुख होउनिया
पाहिलेंस काय कुठें ?
पाहुन जें बघण्याची
एकदांच हौस फिटे
अंतर्मुख होण्याची

गरज नसे, सवड नसे
फक्त इथें जगण्याचें
सर्वांना हाय पिसें

१४-११-५७

* * *

# राष्ट्रध्वज

जगीं उंच फडकु द्या विजय तिरंगी
महान् हा ध्वजराज ।। धृ० ।।

नारंगी रंग हा त्याग धैर्य शौर्याचा
पांढरा तपोबल आणिक पावित्र्याचा
हा हिरवा भूच्या सुफलित सौभाग्याचा
वरि नीलचक्र भगवान् देइ जणुं
निज शक्तीचा साज ।। धृ० ।।

तूं दिलीस दीक्षा आम्हां बलिदानाची
वज्राचें मनगट छाती पोलादाची
तूं साक्ष सनातन अमुच्या अमरत्वाची
तूं जागृत दैवत क्रांति शांतिचा
घुमवितोस आवाज ।। धृ० ।।

पंजाब-सिंधु गुजराथ महाराष्ट्राला
हिंदु वा मुसलमिन् ख्रिस्ती ब्राह्मण त्याला
तव महामंत्र ऐक्याचा तारक ठरला
राज्य निधर्मी मानवतेचा येथें रीतिरिवाज ।। धृ० ।।

तूं आमुची आशा विविध जरी त्या भाषा
एकात्म भाव तूं विविध आमुच्या वेषा
तूं मानदंड जगिं महान् भारत देशा
घे मानवंदना तूंच अमुचा भाग्यविधाता आज ।। धृ० ।।

* * *

# तंतकवींची नवी लावणी

राजगिऱ्याचें कणीस फुटलें मिटल्या ओठांवर
लावण्याची ललित लेखणी भांग ललाटावर ॥

गालाच्या त्या तांबड मातित मुरमाची मोहरी
भिवईवरती दिसती शामल तुळशीच्या मंजरी ॥

सडपातळ त्या शेलाटीवर पपई फोफावली
सुमगंधानें धरलि शिरावर काळीभोर सांवली ॥

कोंभ केळिची काया कवळी नाजुक चवळी जशी
बोरमाळ बाभळी फुलासम गळ्यांत दिसते ठुशी ॥

पायघोळ पायांत चालतां अडखळतो वरि वरी
पैंजण झुमकेदार त्यामुळें येति चव्हाट्यावरी ॥

कमरबंद त्या माचपट्याला चांदीची साखळी
लांडोरीसम घाटदार कटि पाठिमधें वांकली
एका हातीं होतें खुरपें अर्धचंद्र वाकडें
सरळ करिल ही मर्दमिशीचे कोरदार आंकडे ॥

बाजाराच्या दिवशीं दिसली उडती अशि बावडी
सांडत होत्या रसरंगाच्या रंगदार कावडी ॥

शहराच्या किती आल्या गेल्या उगाच नटती किती
भर ज्वानीला बहार नाहीं प्रसाधनें हीं किती ॥

ही खेड्याची साधी भोळी मराठमोळी तऱ्हा
तंतकवींची नवी लावणी आज आलि कां घरा ॥

१-२-१९६३

* * *

# चाललें तत्त्वांचें पूजन

चाललें तत्त्वांचें पूजन
चाललें सामाजिक जीवन ॥ धृ० ॥

सत्यासाठीं, सत्यासाठीं
लावुन बसले रंगीत पाटी
स्वार्थ चितेवर जाळित बसले
सत्याचें सरपण ॥ १ ॥ धृ० ॥

जो तो म्हणतो नीती नीती
सोयीची लावीत संगती
असाध्य होतां तेंहि--
म्हणे हें काल्पनीक बंधन ॥ २ ॥ धृ० ॥

बंधुभाव उद्घोष निरंतर
परस्परांतच जळतो मत्सर
पुराणतलीं वांगीं 'गेलीं'--
पुराणांत करपुन ॥ ३ ॥ धृ० ॥

कालदशा ही रोज बदलती
धर्माच्या व्याख्याहि बदलती
शरीर धर्मातच या केवळ
कुजकटतें जीवन ॥ ४ ॥ धृ ०॥

आक्रमणाचीं शस्त्रें हातीं
मुखीं म्हणावें शांती शांती
मानवतेचें मारेकरि हे--
त्यांचें ढोंगीपण ॥ ५ ॥ धृ० ॥

७-४-१९५६

* * *

## सुभगबंधुरा

सुभगबंधुरा, भांगसिंदुरा, इंदुवरा सुंदरा
अनंबर अचपल कचमंथरा ।।
निरवलंब ती प्रलंबवेणी विप्रलंभ दाविते
फुलांची स्वप्नगंध भाकितें ।।
कोरांटी सुम सुरंग काया कुरंग नयनानना
सुरूपरि लवलवती अंगना ।।
पदर घालितो प्रदक्षिणा करि क्षणा क्षणा ईक्षणा
असेही रसिकांना दक्षिणा ।।
नखऱ्याची ही नार नवेली नेपथ्यें प्रगटलीं
गुल्छबू इष्की इस्तंबुली ।।
उरोजावरी मांसल निस्तल पुढ्यांत झेपावती
असे ही रसिकांना पावती ।।
चालतां पथीं पद आतषबाजी करी
भुइनळचा परी ही उडवी ठिणग्यावरी
ही मस्त मदालस मस्तानी साजरी
तिच्या जिवाचा बाजिराव कुणि घाव तिचे झेलिल
परी हें इतरांना मुष्किल.

२२–३–६३

* * *

## गुबुगुबु नंदी बैल--

गुबुगुबु नंदी बैल--
मालकाची दोरी सैल
कातड्याचा घुमे ढोल
गुबुगुबु नंदी बैल ।।

मालकाच्या मनापरी त्यानें तुला सजविले
अपरूप नव्या जुन्या चिध्यांनीं त्या नटविलें
फक्त मान डोलवाया आहे तुला शिकविलें
ठकलेल्या मालकानें आहे तुला ठकविलें
होयबाची वृत्ती तुझी, हवातसा देसी कौल
गुबुगुबु नंदी बैल– मालकाची दोरी सैल
बोथटलीं शिंगें तुझीं कोयत्याची करामत
पितळेच्या कळसाची– सांगतोस शहामत
नकशीच्या झुलीवर फाटक्याची कळा आहे
लादलेलें ओझें तेंही म्हणतोस माझें आहे
मिळेल तें खाणाऱ्याचा काय जगीं डामडौल
गुबगुब नंदी बैल–मालकाची दोरी सैल ॥
दारोदार नित्य तुला आतां आहे फिरायाचे
नाशिवंत शरीर हें आतां आहे जगायचें
रस्तोरस्तीं चारचौघे टवाळहि जमतात
लागतसे पणाला रे तुझी सारी करामत
बोथटल्या वृत्तिच्याच आवृत्तीचा आहे खेळ
गुबुगुबु नंदी बैल– मालकाची दोरी सैल ॥

* * *

## ऋतु वासंतिक सम्राट

ऋतु वासंतिक सम्राट
बघा रान लक्ष्मिचा थाट
चांदीची पाउल वाट पाण्याचे पाट ॥ धृ० ॥

झुंजुमुजु लाविलं कुंकु अभाळीं ऐना
नेसली तनुवर पान फुलांचा गहिना
मैना नी पोपट तिच्या दारिचे भाट ॥ १ ॥ ॥ धृ० ॥

ती गर्द लाल गुल्मोहर उभी उन्हांत
पोसला पोपटी रंग तिच्या हृदयांत
रांगोळी रंगित झेलि लतांचे हात
करि पंखा घेउन वारा करि वहिवाट ॥ २ ॥ धृ० ॥

बिजवरा सूर्य जणुं ढळतो माथ्यावरती
अंबा नि जांब जांभळीं चामरें धरिती
अन् त्यांत उन्हाचीं पोरें दंगा करिती
सावल्या मुलायम आंत कलाबुत दाट ॥ ३ ॥ धृ० ॥

मोकळीं शिवारें वारा होइ सुसाट
किती सुंदर सजला सजणें सारीपाट
पक्षांच्या कवड्या उडती गगन अफाट ॥ ४ ॥ धृ० ॥

मी वयांत आलें तुझ्या परी रसरसलें
मन तनही माझें आरपार मुसमुसलें
अन् आंत कुठेंतरि कांहितरि मज डसलें
तुडवीत कुणाची जाऊं पाउल वाट ? ॥ ५ ॥ धृ० ॥

* * *

## मज बदल हवा !

मज बदल हवा – मज बदल हवा !
संस्थांनीं तीं देवस्थानें
खंडोगणती कुजले खजिने
दैन्य इथें तर लाजिरवाणें
मानवतेच्या उद्धारास्तव–
मानवांतला देव हवा – मज बदल हवा
धर्मरूढि त्या परंपरेचे
पाथिक आम्हीं जीर्ण मनाचे
या डबक्यांतच मरावयाचे

समाज रचने साठि नव्यानें–
स्मृती लिहा अन् वेद नवा– मज बदल हवा
वारकऱ्यांच्या नको पताका !
खांद्यावर द्या सज्ज बंदुका !
श्रीकृष्णाची नवीन गीता
राष्ट्रिय ऐक्याच्याच विटेवर––
आज विठोबा हवा नवा – मज बदल हवा
काव्य कला संगीत नृत्य तें
चित्रकला स्थापत्य शिल्प तें
जें जें मानवतेस फुलवितें
साफल्याचा सत्य शिवाचा ––
आशय त्यांचा हवा नवा – मज बदल हवा
चूल मूल घरकुलांत पचली
नको बाहुली आतां असली
नव्या प्रेरणा जिच्या हवाली
हवी अशी सौभाग्यवती जी––
सार्थ करिल पुरुषार्थ नवा– मज बदल हवा
यायच्याच जर जुन्याच याद्या
हैड्रोजन वर्षाव होउं द्या
अॅटमचा ही स्फोट भडकुं द्या
राखेलाही मंतरणारा –
माणुस तो जन्मुं द्या नवा – मज बदल हवा.

* * *

## कधीं मज भेटशील सुंदरी

कबंधावरी मंद सुगंधित प्रबंध अलकांकित
फुलोरा त्यावर पुलकांकित
अंगि तिच्या अंगार अंगिका अंगद दंडावर
सुवर्णें सुवर्ण हो सुंदर

अंचल चंचल स्वैरपणें करि अंग अंग अंचित
उघडलें कायेचें संचित
नयनीं नीरांजनास झालें अनुरंजन अंजन
करितसे कटाक्ष अनुसिञ्चन
अतिरूपा अतिरेक रतीचा अतिरथिना मोहवी
लालसा लास्य तिचें लोभवी
भालावर ती भृकुटीं भूषण भांगीं भृंगारक
तळपवी तमस तंतु मोहक
रसकुभांचे करी निबंधन पदर उरोजावरी
वरिवरी स्वकरीं ती सावरी
मदमत्त नितंबिनि निःसंशय नाटिका
ही पुरुषार्थाच्या प्रांति पुष्पवाटिका
ही नैसर्गिक सखि नूतन पांचालिका
प्राणाचे मम पांडव मांडीव तांडव करिती उरीं
कधीं मज भेटशील सुंदरी?

२०-३-६२

* * *

## अहो, सारं नकली आहे

रुपायांत चांदी नाहीं
शिवापुढें नंदी नाहीं
कशालाच बंदी नाहीं
खोली नाहीं रुंदी नाहीं
जागा अमुची हुकली आहे
अहो, सारं नकली आहे
वर भपका पोकळ आंत
गप्पा साडेसात हात
दिसायाला हसरे दांत

अंदरकी कुछ और बात
लाज अब्रू विकली आहे
अहो, सारं नकली आहे
तूप आमच्या पोळीवर
पोळी भाजूं होळीवर
दानत अमुची टपली आहे
गरिबांच्या झोळीवर
कर्तबगारी खचली आहे
अहो, सारं नकली आहे
तोंडा पुरता नमस्कार
पाठ फिरतां शिव्या चार
उपरा अमुचा शिष्टाचार
फिरतों आहोंत दारोदार
मानवताच चुकली आहे
अहो, सारं नकली आहे

* * *

## ' काममूर्ति '

टचटचत्या गोबऱ्या कपोलीं मधेंच पडली खळी
सफरचंद देठांतुन सुटलें मदनाच्या राउळीं
अर्धामुर्धा भांग झांकला केशकलापी कला
गोऱ्या गालीं कानशिलांवर दुर्वांकुर उमलला

पिऊन मस्ती मस्त जाहली वेणीची धामिण
लाल लाल गोंडयांनीं दिसला मला दिवा लामण
काचोळीच्या घट्ट मुठींतुन लोण्याचें मीपण
दुधातुपाची कांती घेउन आली कां गवळण ?

बांकदार त्या पाठकण्यांतुन कासोटा लोंबतो
पाठीच्या पालखीस झोंबुन पदर पहा झिंगतो
जरिकांठी त्या दंडाखालीं कळसदार कोंपरे
हल्या झुल्यानें काकणांस त्या करीं कांपरे भरे

कटीस करकचलेली साडी करी गोल कंगणी
लखलखतो खर्बुजी पोटिमा ठळकपणें त्यांतुनी
चवड्यावरची चाल दाविते गोळीदार पोटरी
अशी दिसे प्रछन्न प्रणयिनी प्रमदा सखि अस्तुरी

२-२-६३.

* * *

## देव त्याला मुजरा करतात

हे कोण धरमदास
लाजवितात कसायास
दत्ताच्या त्या देवळामधें
उभे असतात तीन तास
रावसाहेब तुमच्या नांवें
नासका नारळ आज फुटला
शनीहून काळीं कृत्यें
तुमचा धंदा नाहीं सुटला
हे कोण ब्रम्हचारी
बजरंगाचे भगत भारी
तिरपा डोळा उडवितात
जुळतां कुठें एकतारी
ह्या कोण ठकूताई
टिनोपॉल फिनिशबाई

अहो त्यानी नवरा टाकला
देवा रामा तुझ्यापायीं
हे कोण विठ्ठलपंत
टिळा माळ धारण करतात
बघतां बघतां हातसफाई
कुंकाचा ते बुक्का करतात
देव नाहीं धर्म नाहीं
समाज याला नास्तिक म्हणतो
तोच तुमच्या आमच्यासाठीं
वाटेल तेव्हां जीव देतो
देव हाच माणसामधला
देव माणसें अशींच असतात
इथें नाहीं, स्वर्गांमधून
देव त्याला मुजरा करतात

११-१२-६२

* * *

## केसांचा किरिट शिरीं

केसांचा किरिट शिरीं, रंगदार भांगदार
गजऱ्यांतिल पुष्पांचा, त्यांत पुन्हा दिल्‌बहार ॥

दिल्‌बहार अंगावर, छेडितसे तार तार
स्वयं तूंच झालिस गे, रमणिय अति रतिसतार ॥

खांद्यांतुन सुटलेले, हातांचे चंद्रहार
चंद्रमुखीं चंदेरी, हलणारे तव मिनार ॥

फांदीवर फळ आले, देंठ रुतें आरपार
चोळीच्या कांठाला, साडीची जरिकिनार

ओठांची मलपृष्ठें, बंद कधीं उघडणार
हास्यांचा आशय ही शब्दांतुन सांडणार
कधि मुक्याच भाषेनें, पापणि तव खुणविणार
स्वर्गीचें सूत असे गाल–खळी जमविणार
तोंवर स्वप्नांची तरलता तरंगणार
तुटलेलें हृदय अतां कुठवर मी सांधणार

* * *

## ' स्त्री '

तूं माता पत्नि कुमारी
हीं तुझींच रूपें सारीं ॥ धृ० ॥
तूं अन्न ब्रम्ह जगताचें
तूं परब्रम्ह प्रणवाचे
तूं रसरंगाची स्वर्गंगा अवतारी ॥ धृ० ॥
तूं दिलास पांगुळगाडा
पढविलास पहिला पाडा
तूं मुळाक्षरांची मूळमाय संसारीं ॥ धृ० ॥
ती कण्वकन्यका रडली
कर्णास्तव कुंती कुढली
या भारतमाता असती धन्य कुमारी ॥ धृ० ॥
तूं असती सीता शुद्धी !
संशयी जगीं दुर्बुद्धी !
त्या अन्यायाची अजून येइ शिसारी ॥ धृ० ॥
तूं मंगल मांगल्याचे
तूं सार्थक संसाराचें
पदरांत तुझ्या ग दुनिया लपलीं सारी ॥ धृ० ॥

* * *

## ताजमहाल

चांदण्या फुलांच्या लखलखती गजऱ्यांत
चांदण्या रात्रिची शोभा कचपाशांत
त्या अंबाड्याचा स्पंज सदा थबथबला
जस्मीन केवडा गुलाब कधि दरवळला
स्फटिकांत जडविले सुंदर शाळिग्राम
ते बसवित असतां फुटले दोन बदाम
त्या बदामावरी केशर काळेभोर
हेच ते बोलके डोळे दोन टपोर
शरबती ओठ शिपांत सांठले मोती
दंवबिंदु सांचले किंवा कमळावरती
नेसली हिमालय बर्फाची जरतार
गंगा नि सिंधुची सुंदर त्यास किनार
स्कंधांचे हलके हलते दोन मिनार
ही कुणा शहाची असेल हो गुलनार
हें संगमरवरी स्वरूप बघुन म्हणाल
मुमताज निघाली घेउन ताजमहाल

* * *

# आठ शृंगार नायिका

## " स्वाधीनपतिका "

( पतिनिष्ठ प्रेमिका )

मदन महोत्सव आज चालला शारदाच्या अंगणीं
साजणासवें सुरत साजणी

पतिव्रता स्वाधीन पतिक ती अनन्यनिष्ठावती
सुभग ती स्वीया सखि कुलवती
विचित्र उज्ज्वल पीतांबर गत पीन पयोधर युती
संगमा उत्सुक उन्मुख किती
स्नात गंध कुंतलीं माळिली अबोलिची मालिका
मधुर ही मदनवदन वल्लिका
कानशिलांवर काजळ रेखन नयनामीनाकृती
भृकुटिच्या गळांत त्या अडकती
अरुणबिंब अधरोष्ठ विलासी वदन विद्रुमावरी
पौर्णिमा प्रसन्न कांतीवरी
कृशकटि बारिक विलोल लवते जघन पुष्ट सुंदरी
कामिनी सफल–काम मंदिरीं
आसुसलेल्या अंगांगावर अभिनय विभ्रम करी
प्रियंवद संभाषण चातुरी
हिरवळ कुरवाळित बसली ती हरित मंचकावरी
घुमतसे आवाहन अंतरीं
शेवंतीच्या ताटव्यामधें झेंडु जसा दाटला
तसा तो सखा तिचा वाटला
छेलछबेल्या चमेलिचा उद्दाम दर्प सांडतो
तिचा शृंगारहि ओसंडतो
सखि भ्रमितमती ती पति देखत जाहली
रति आक्रमणाच्या कवेंत तीं नाहलीं
सायुज्य मुक्तिनें दोघेही संपलीं
प्रलयंकर शंकरा भेटली विलासिनी पार्वती
रंगते रति रस–लय संगतीं

१–४–१९६३

* * *

## " वासकसज्जिका "

( प्रियकर निश्चित येणार म्हणून अंतःपुरांत वाट पहाणारी.)

नायक अपेक्षिका ही सजली सखि वासकसज्जिका
अनुनयीं प्रियकर संपूजिका
थाटमाट ती करून बसली अभिनवतेनें नटून
पाहते क्षणाक्षणाला उठून
आज यायचा प्रियकर घुमवित प्रणय-मधुर पावरी
कावरी होइ रंगबावरी
मनांत मन्मथ उरांत यौवन आरपार दाटतां
तटतटे कंचुकि अपराधिता
क्रीडेला झपताल यावया पैजण पदिं घातले
सळाळुन तेही परि मातले
स्पर्श सुखाला नको अडथळा नकोच मणिभूषण
आज ते होइल तिज दूषण
सखा तापतां उपशम त्याचा करतिल कच स्नातलें
सुगधी म्हणुन आज नाहलें
मुक्त कचांची चवरी चामर रायावर ढाळिन
अंगिचा गुलाल ही उधळिन
शयनमदिरीं शेज फुलांची स्वतांच मी सजविली
गुलाबी पाण्यानें भिजविली
रंग रसाचे छान खसाचे पडदे मी बांधिले
चैत्रबन मंदिर मी बनविलें
अत्तरदाणी, गुलाबपाणी, तबकीं ओथंबते
तशिच मी ओथंबुन थांबते
प्रियकर सुखकर येइल केव्हां वाट पहावी किती
सत्त्व किती प्रणय-पुरुष पाहती

जांभया येति पापण्या सहज झांकती
उन्मळुन अंगप्रत्यांग रंग टाकिती
फुल्लारविंद तीं दलें पूर्ण फांकती
" वासकसज्जा " वाट पाहते अंतःपुर स्वामिनी
अधिर ती व्याकुल कुल कामिनी ॥

२-४-६३

* * *

## प्रोषितपतिका

( प्रियकर प्रवासी असल्यानें दुःखित झालेली प्रेमिका )

दूर देशि परदेशि जाहला वनवासी जिवलग
माझिया मनीं होइ तगमग
जरी क्षणाची ताटातुट ही अतूट रतिभावना
शयन मज दावि स्वप्नरंजना
दिवस रात्रिचे मणी मोजिते विरह–वन्हि सोसुन
सख्याचें मोजित आश्वासन
किती विनवण्या केलि विनंती तरी न आली दया
सख्या रे मुकलें मी अनुनया
तुझ्या आवडिचा तुझ्या निवडिचा साज कशाला करूं
कशाची आस मानसीं धरूं
अश्रू गाळित पिसेंहि ढाळित मरगळले पाखरूं
धीर मी कुठवर आतां धरूं
तुझी कळेना ख्यालि खुशाली मशाल मनिं पेटली
व्यथेची राख अंगि चर्चिली
असून जिवलग झालें जोगन जोबनशाही सुनी
जाहले हतभागिनि भामिनी

मला न माझी पर्वा राया तुझी कायरे स्थिती
प्रवासी दैवाची दुर्गती
जेवत असशिल कुठें ? राजसा सुखशय्या तुज कुठें
जीव हा तिळतिळ माझा तुटे
दाटते न चोळी सैल होति कांकणें
हें कृषांग माझे सदैव पतिधार्जिणें
हें घडलें सारें सख्या अभावितपणें
तूं नाहिंस तर दुनिया नाहीं सर्व सौख्य संपलें
तुझ्या मी विरहानें करपलें

* * *

## अभिसारिका

( इष्टस्थळ ठरवून आलेली तिथें प्रियकर हजर आहे )

वैशाखीं हा वादळवारा धूळ चारितो नभा
संपली नभा तुझी सुप्रभा
अवचित येती मेघ तराउन बिजली कडकड करी
सरीवर सरी बरसती शिरीं
झपाटलेली पिसाटलेली धरणी करि कंपना
वसंता तूंच करी सांत्वना
अशाच वेळीं संध्याकाळीं संकल्पित सुस्थळीं
नव्हे संभाव्य मदन राउळीं
मस्त मदनिका चारुचंद्रिका अभिनव अभिसारिका
निघाली भेटाया नायका
पुलक पुरंध्री रोमरंध्र ती सैरंध्री सम नटे
उफाळुन रति ही सुरता उठे

उत्तेजित होउन स्वतां ती झाली उत्तानिका
अशी ही निर्भय अभिनायिका
काजळ ओठीं तीट कपाळीं शुद्ध राहिली न तिला
मानसें मन्मथ मद मंथिला
घाइंत गळल्या नुपुर मेखला कळलें नाहीं तिला
अशी बेबंद होइ चित्कला
करील धाडस करील साहस कुणि न तिला रोखितां
अनामिक काम लक्ष वेधिता
तीरा सम कोसळून येतां ढाल छातीची करी
प्रियकरा तूंच तिला सांवरी
संस्पर्श सुखानें दोघेही भेटलीं
तीं अग्नि काम दिठि मिठींत कवटाळली
बेफाम बहकली वृत्ति तिची शांतली
संगमांत नाहली रसानें लयींत अनुकंपली
सखी ती सर्वस्वें संपली

३–४–६३

*　　*　　*

## विरहोत्कंठिता

(प्रियकर विरहानें व्यापलेली प्रेमिका)

आज ग्रीष्म चेतवी भोंवती हेमंतीं या कुणी
सखे ग सांग चतुर भाषिणी
अंग अंग पोळतें सखी मज मदन दाह साहिना
कशाला गुलाब अत्तर हिना
मलय गिरीची चंदन छाया झाली ज्वालामुखी
प्रियाला झालें मी पारखी

नको वाजवूं वीणा सखय स्वर होती संगिनी
राग मज आणि राग-रागिणी
नकोस वारूं वाळ्याचा हा पंखा सखि वरिवरी
वाटते तक्षक दंशच करी
रंगहीन शृंगार मंदिरीं उरली नाहीं कळा
उपवनीं जीव करूं मोकळा
मला हिणविती वृक्ष वल्लरी सखये सवती परी
कळ्यांच्या सुया निजांगावरी
राजहंस-हंसिणी तडागीं तन्मय झाल्या किती
मला एकटीस ग हिणविती
दुडुदुडु धांवत आल्या हरिणी जिवलग मम मैत्रिणी
वाटती मला तिरस्कारिणी
माझी मी जाहलें वैरिणी सखि चिर विरहोत्कंठिनी
रमेना मानस जनिं वा वनीं
करि इलाज यावर कांहीं सहचारिणी
आजन्म तुझी मी होइन बाई ऋणीं
मी तृषार्त पाजिव मला रंग वारुणी
विरहोत्कंठित लोहलतेला स्पर्शिल पारसमणी
कधीं ग सांग सांग साजणी ?

४-४-६३

* * *

## विप्रलब्धा

(इष्टसंकेत स्थळीं प्रियकरानें न येतां फसविलेली प्रेमिका)

आज दगा मज दिला उगा कां अगा प्रणत जिवलगा
बेत हा तुझा अनृत वाउगा

सांकेतिक एकांत ठरवुनी दिला मला वायदा
मोडिला तूंच तुझा कायदा

शिरीष तरूंच्या कांठि नदीच्या तटीं कुंज उपवनीं
उडाली स्वैर मनोपक्षिणीं

अंग अंग नवरंग उधळतो उफाळला मन्मथ
पातले तशीच तनु झेलित

मदन विलासी संभवात मी झालें मनिं मदनिका
आज या चारुगात्रि वन्हि का ?

आज रास रतिविलास रचिला कलाकुसर दाउनी
कामनापूर्ती संकल्पुनी

नव्हती ठाउक कुणालाच ही प्रणयाची पर्वणी
मनोरथ तूंच दिले उधळुनी

असुसलेलें अंग मोडतें येतां आंतुन कळा
जाहला सोन कंद सांवळा

चुकवुन घरचा कोट पहारा आलें इष्ट स्थळा
कटीची सोडुनिया मेखला

विश्वासघात केलास निर्दया किती
तुज काय नसावी माझी इतुकी क्षिती
कां ठरविलीस मग तिथी आणखी मिती
विप्रलंभ भामटा तुझा हा फसलें पडलें फशी
असोशी उरांत-उरली तशी

५-४-६३

* * *

# खंडिता

( प्रियकर परधार्जिणा असल्यानें स्वत: दु:खित झालेली व
तसाही पति घरीं यावा म्हणणारी)

पर दारा कामना तुझी रे करी मानखंडना
तंडसी सुखद सुरत मंडना
मदनध्वज फडकवीत जासी सुंदर पुरुषोत्तमा
डावलुन मज सम तीलोत्तमा
लोभस लाडिक तुझ्या रुपावर फिदा कितिक साजणी
असा तूं खटचाळ छत्तिस गुणी
रात्र तुझी रंगते दुजीच्या शेजेवरती सदा
कधींतरि येशिल कां एकदां
शृंगाराच्या दांतनखांच्या जखमा घेउन उरीं
प्रभातीं येसी अपुल्या घरीं
कितिक दिवस हा जाच साहूं मी असह्य झालें मला
कठोरा केलिस तूं कोमला
मानभंग अन् तेजोभंगहि करशिल माझा किती
अपेक्षाभंग हि झाला किती
तुरंग झालें रंग निकेतन अंधारी कोठडी
शेज उशि झाली रे पोतडी
अपराजित अपराधी तूं नच विधिनिषेधही तुला
पांखरा भ्रमसी पाहत फुला
वैतागुन मी दिलीं टाकुनी प्रसाधनें भूषणें
कुणास्तव आतां शृंगारणें
तूं सूर्यसखा दिवसास बघावें तुला
रात्रींस कुठेतरि मैफिलिचा मामला
हें कळून येतां जीवहि संतापला

अखंड मी खंडिता जाहलें असुन चतुर पंडिता
तुझ्यावर काया कुरवंडिता

६-४-६३

*  *  *

## कलहांतरिता

(पतीची माया असूनही तो परदारागमनी असल्यानें त्याच्याशीं भांडण करणारी)

पति गेला ग रुसून असुन अन् नसुन व्यर्थ मी ठरलें
मीं स्वताच सखये ! कलहाला या वरिलें
सदाकदा परदारागमनी करी मला वंचित
असे मम करुणाघन संचित
पतिव्रता रतिनिष्ठ अशी मी एकमेव अंतरीं
असावा सखाहि सखि मजपरी
एवढेंच सुख नाहीं नशिबीं मजला सवती किती
मदन धन माझें या चोरिती
प्रारंभी मी होतें शंकित निःसंशयल्या खुणा
पती ग आहे परधार्जिणा
भांडलें तंडलें केलें वाक्ताडन
मी कलहान्तरिता स्वतांच ग होउन
मी तिरस्कारिलें येतां तो होउन
पश्चात्तापें पुन्हां पुन्हां मम कातरतें अंतर
परत घरिं यावा पति प्रियकर

७-४-६३

*  *  *

## रणांगणावर चला साजणा

रणांगणावर चला साजणा,
रणांगणावर चला ॥
तोडुन टाका शृंगाराच्या उच्छृंखल शृंखला ॥ धृ० ॥

मध मुरून गात्रीं यौवन हो अनवद्य
पापणिच्या द्रोणांतून सांडतें मद्य ॥
ओसंडत आहे कांती रिमझिमणारी
अधरांत अर्धवट हास्याची फुलवारी ॥
भाळिची ढाळिते कमान पिंपळपान
भांगास रेखिल्या गंधाचें अनुदान ॥
तुमच्यासाठीं रसरंगाचा मीच मळा शिंपिला
साजणा रणांगणावर चला ॥ धृ० ॥

भिवईच्या डाहळिस हिंदोळा डोळ्याचा
केशरी पिंजरा कोळ्याच्या जाळ्याचा
वेणीच्या गिरक्या मान घेइ उत्तान
मोकळा गळा घे गोफ वेणिची तान ॥
मस्तीनें उराच्या उसवे चोळी तंग
उत्तुंग अनंगा सोडुं नको सत्संग ॥
सहवासाच्या या सौख्याचा सरतां क्षण संपला
साजणा रणांगणावर चला ॥ धृ० ॥

तापल्या दुधाला विरजण मी घातलें
तें अलगद उचलुन शिक्यावर ठेविलें ॥
जय संपादुन या तोंवर मी थांबतें
हें विरह दुःख दोघांस जरी पोळतें ॥
तरि हिमालयावर रणभेरी गरजते
समशेर शत्रुची हिंसेस्तव परजते ॥

अंगांगावर जखमा घेऊन भेटाया या मला
साजणा रणांगणावर चला ॥ धृ० ॥

मी वीरकन्यका, वीर पत्नि मी तुमची
ही सोबत आहे सख्या सात जन्माची ॥

घडलीच कथा जर कांहीं दुर्दैवानें
हरपलें जरी मम सौभाग्याचें लेणें ॥

लावीन टिळा मी तुझ्या अमर कीर्तीचा
तुज मान मिळावा परमवीर चक्राचा ॥

माझ्या कुंकानेंच भरा तुम्हि मळवट रणचंडिला
साजणा रणांगणावर चला ॥ धृ० ॥

३०-१-१९६३

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 36056 वि: काव्य
क्रमांक 9630 नों दि 70/4/64
REFBK-0013492
REFBK-0013492
93802